आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

ulsav LAWNS & BANQUETS
उत्सव लॉन्स अँण्ड बँक्वेट्स
सोहळा होईल दिमाखदार
लग्न, साखरपुडा, मौंज, वाढदिवस, कॉर्पोरेट इव्हेंट्ससाठी सुयोग्य ठिकाण.
एसी बँक्वेट हॉल | भव्य लॉन | प्रशस्त पार्किंग | AC रूम्स
बुकींग संपर्क - 7410 510 376 | 7385 951 303

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १३.१०.२०२५ | अंक नं. १६३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

THE BEST Chetak YET 35 SERIES
Chetak 3501 | Chetak 3502 | Chetak 3503
24X7 ROADSIDE ASSISTANCE*
GENUINE ACCESSORIES*
SOLID METAL BODY
TOP SPEED OF UP TO 73 km/h
APP CONNECTIVITY* ON ANDROID AND IOS
UP TO 153 km RANGE, ARAI CERTIFIED
IP67 RATED WATER RESISTANCE
5 YEARS EXTENDED WARRANTY*
Authorised Dealer Of Chetak
JEET MOTORS Chetak
SHOWROOM
Next to Akshata Garden Station Road
Sukkur Chowk A.nagar. M-8055-807-567
WORKSHOP
Next to Radha Krishna Mandir
Sarjepura A.nagar. M-8055-800-287

खास दिवाळी साठी ऑफर
Dream world... SACHI Fashion
लहान मुलांच्या वस्त्रांची स्वप्न नगरी
२ ड्रेस खरेदी करा १ मोफत मिळवा

तुम्ही ॲलर्जीने त्रस्त आहात का?
वारंवार होणारी सर्दी, खोकला व दमा विकार
शरीरावर लाल चट्टे येऊन अंग सुजणे व खाज येणे.
ॲलर्जी कमी करण्यासाठी औषधे घ्यावी लागणे.
नेहमी डोळ्यांना खाज सुटणे व डोळे लाल होणे.
कोणत्याही वयातील रुग्णांसाठी वरील व्याधींवर आता खात्रीशीर निदान व उपचारासाठी नगर जिल्ह्यातील एकमेव परिपूर्ण असे
"अहमदनगर ॲलर्जी टेस्टींग सेंटर"
डॉ. कृष्णा बलदवा
(एम.बी.बी.एस.) ॲलर्जी-त्वचारोग, दमा व मधुमेह तज्ञ
-:नवीन पत्ता:-
जुने वाळिंबे हॉस्पिटल, वर्धमान टायर समोर, बांबु गल्ली, धरती चौक, अ.नगर
Mo. 8390907414 / 9422227414
सोमवार ते शनिवार * वेळ : स. १० ते २:३० सायं. ६ ते ९. पर्यंत
रविवार * वेळ : स. १० ते दु. १ पर्यंत

SONI TILES Since 1965 AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999

सर्व दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ 888/-*
डबल फायदा
जेवढ्या वजनाचे सोने तेवढ्या वजनाची चांदी
चक्क फ्री*
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

भारत देश की सर्वश्रेष्ठ खुशबू
लई भारी ! १ नंबर
परिमल भारतवासी
तसेच मोमेन्टस, इंडियन कस्तुरी, केशर चंदन, खस (वाळा), ब्लु बर्ड, यात्रा, पिंकलोटस, हिना कस्तुरी, शाहीऊद, महालक्ष्मी, शुभलाभ (६ ईन १ पाऊच रु.६० चा ५० मध्ये)
अगरबत्ती चे जिल्हा वितरक व कापुर, शेंदूर, अत्तर, धुप, होलसेल व रिटेल साठी
केवल अगरबत्ती
हॉटेल रसरंग समोर, आडते बाजार, अ.नगर.
तसेच ३ फुट पासुन पुढे अल्युमिनीयम लॅडर (शिडी) उपलब्ध

# ऐन सणासुदीही बाजारपेठेत विजेचा लपंडाव

## व्यापारी वर्गात तीव्र नाराजी, महावितरणच्या अधिकाऱ्यांचे आश्वासन ठरले फोल

नगर – दिपावली आठवडाभरावर येवून ठेपलेली असताना शहराच्या बाजारपेठ परिसरात विजेचा लपंडाव सुरु झाल्याने व्यापारी वर्ग त्रस्त झाला आहे. व्यापाऱ्यांनी मागील आठवड्यात आ.संग्राम जगताप यांच्या समवेत महावितरणच्या अधिकाऱ्यांना निवेदन दिले. त्यावेळी अधिकाऱ्यांनी दिलेले आश्वासन हवेत विरले आहे. त्यामुळे तीव्र संताप आणि नाराजी व्यक्त होत आहे.

दसरा, दिवाळी हे हिंदू धर्मातील प्रमुख सण उत्सव आहेत. या कालावधीत विविध प्रकारची खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत ग्राहकांची मोठी गर्दी होत असते. यामध्ये लहान मुले, महिलांची संख्याही मोठी असते. कापड बाजार ही जिल्ह्याची मुख्य बाजारपेठ असून या ठिकाणी खरेदीसाठी जिल्हाभरातून नागरिक येत असतात. बाजारपेठेत ऐन गर्दीच्या वेळी अचानक वीजपुरवठा वारंवार खंडित होत आहे. तसेच अतिशय कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याने विजेवर (पुढील मजकूर पान २ वर)

# जाहीर नोटीस

अंजुमन तरक्की ए उर्दू E २४ अहिल्यानगरच्या सर्व संबंधितांना व नागरिकांना सूचित करण्यात येते की, दिनांक ०९/१०/२०२५ रोजी दैनिक नवा मराठा या वर्तमानपत्राच्या पान क्रमांक १ वर श्री. सय्यद अब्दुल मतीन अब्दुल रहीम (तत्कालीन चेअरमन) यांच्या नावाने प्रसिद्ध करण्यात आलेली नोटीस ही पूर्णपणे खोटी, बनावट व दिशाभूल करणारी आहे. संबंधित नोटीसमध्ये ठरावाची दिनांक व क्रमांक जाणीवपूर्वक लपविण्यात आलेले असून, ती घरगुती पातळीवर तयार केलेली खोटी नोटीस आहे.न्यासाचे विद्यमान सेक्रेटरी फक्त श्री. शेख तन्वीर चाँद असून, संस्थेच्या नोंदीनुसार हेच कायदेशीररीत्या मान्य अधिकारी आहेत. ठरावासंबंधी खरी माहिती खालीलप्रमाणे असून, ते सत्य व बरोबर आहे व त्या बाबत ज्यांना शंका असेल ते इच्छुकांनी या संदर्भातील सर्व दस्तऐवज मा. सहाय्यक धर्मदाय आयुक्त, अहिल्यानगर कार्यालयातून तपासून पाहू शकतात.

**महत्वाची सूचना :** अंजुमन तरक्की ए उर्दू, E २४ अहिल्यानगर या न्यासाच्या तत्कालीन चेअरमन श्री. सय्यद अब्दुल मतीन अब्दुल रहीम हे संस्थेत कुठल्याही पदावर नाहीत. तरीही, ते स्वतःला चेअरमन म्हणून सादर करून संस्था संदर्भात मनमानी कारभार करत आहेत आणि शिक्का व दस्तऐवजांचा दुरुपयोग करत आहेत त्याचे वयाचा विचार करून त्यांना संस्थेच्या कार्यालयात येण्या जाण्यासाठी कोणी हरकत घेत नाही पण कायदेशीर त्यांचा अधिकार नसून फक्त त्यांचे वयाचा विचार करून त्यांना येणे जाणेसाठी सक्ती करण्यात येत नाही व याचा त्याच्या मार्फत गैर फायदा घेण्याचा प्रयत्न चालू असून त्या बाबत कायदेशीर कारवाही करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल.

**न्यायालयीन आदेश** : मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी Writ Petition No. 8628/2025 मध्ये दिनांक १६/०७/२०२५ रोजी आदेश दिला आहे. दिनांक १०/०७/२०२५ रोजी डिप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी दिलेला Provisional Except Order "abeyance" मध्ये ठेवण्यात आला आहे. न्यायालयाने काहीही stay किंवा status quo दिलेले नाही. आदेश रद्द केलेले नाही. त्यामुळे, श्री. सय्यद अब्दुल मतीन अब्दुल रहीम यांना चेअरमन पदावर काम करण्याची कोणतीही मान्यता नाही. जर श्री सय्यद अब्दुल मतीन अब्दुल रहीम हे चेअरमन आहे तर ते उच्च न्यायालयात कशासाठी गेले व कोणाच्या विरोधात गेले?

न्यास ठराव आणि वैध चेअरमन न्यासाच्या मंजूर योजनेतील कलमानुसार, विश्वस्त मंडळाची सभा दिनांक २२/०३/२०२५ रोजीच्या सभेत ठराव क्रमांक २ अंतर्गत २/३ बहुमतीने श्री. सय्यद अब्दुल मतीन अब्दुल रहीम यांना त्यांच्या मनमानी व अनधिकृत कामकाज केल्याबद्दल चेअरमन व विश्वस्त पदावरून कमी करण्यात आले. दिनांक ३०/०३/२०२५ रोजीच्या सर्वसाधारण सभेत दिनांक २२ मार्च २०२५ च्या मंजुरीसाठी आलेले ठराव क्रमांक २ ला मंजुरी देण्यात आली, ज्यामध्ये दिनांक २२/०३/२०२५ रोजीच्या ठराव क्रमांक २ नुसार श्री सय्यद अब्दुल मतीन अब्दुल रहीम हे न्यासाच्या हितास बाधा आणणारे वर्तन करीत असल्याने व वेगवेगळ्या पद्धतीने भ्रष्टाचार करीत असल्याने चेअरमन पदावरून काढण्या बाबत २/३ बहुमताने ठराव मंजूर करण्यात आलेले आहे.

न्यासाच्या मंजूर योजनेतील ज्या कलम नुसार श्री सय्यद अब्दुल मतीन अब्दुल रहीम यांची २१ ऑगस्ट २०२२ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत चेअरमन पदावर नियुक्ती करण्यात आली होती. न्यासाच्या मंजूर योजनेतील त्याच कलमनुसार तशीच दिनांक १३ एप्रिल २०२५ च्या वार्षिक सर्व साधारण सभामध्ये ठराव क्रमांक ५ नुसार २/३ बहुमताने श्री शेख मुशाहीद लियाकत यांची चेअरमन पदावर नियुक्ती करण्यात आलेली आहे व न्यासाच्या मंजूर योजनेतील कलम नुसार नियमाने दिनांक २२ मार्च २०२५ रोजी श्री सय्यद अब्दुल मतीन अब्दुल रहीम यांना चेअरमन पदावरून हटविण्याबाबत व दिनाक ३० मार्च २०२५ च्या सर्वसाधारण सभेत चेअरमन पदावरून काढण्या बाबत २/३ बहुमताने ठराव मंजूर करण्यात आलेली आहे. सदर ठराव आणि नियुक्ती अद्याप वैध आहेत; न्यायालयाने ते रद्द किंवा स्थगित केलेले नाहीत.

**कायदेशीर बाबी व चेतावणी** : तत्कालीन चेअरमन श्री. सय्यद अब्दुल मतीन अब्दुल रहीम यांना कोणताही कायदेशीर अधिकार नाही, तरी देखील त्यांनी मनमानी पद्धतीने ८ कर्मचाऱ्यांची बदली करून मोठ्या प्रमाणात अनियमितता केली असल्याची शक्यता आहे. सर्व दस्तऐवज, आदेश, शिक्का किंवा सूचना जर त्यांच्या नावावरून मिळत असेल, तर ती अवैध मानली जातील. या संदर्भात कायदेशीर कारवाई सुरू करण्यात येणार आहे.

**सर्वांसाठी स्पष्ट सूचना** : केवळ वैध चेअरमन श्री. शेख मुशाहिद लियाकत यांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. कोणताही कर्मचारी, शिक्षक किंवा सभासद तत्कालीन चेअरमन श्री सय्यद अब्दुल मतीन अब्दुल रहीम यांच्याशी शाळे व संस्था संदर्भात कोणताही व्यवहार करू नये. सदर नोटीस सर्व शाळा कर्मचारी, शिक्षक, सभासद व नागरिकांसाठी बंधनीय आहे. कोणतीही गैरसोय, अनधिकृत आदेश किंवा दस्तऐवज आल्यास कायदेशीर तक्रार करण्याचा अधिकार संस्थेकडे राखीव आहे. सदर व्यक्तीने माझ्या नावाची वारंवार बदनामी केल्यामुळे व त्यांच्या ताज्या बनावट नोटीसनंतर हा खुलासा आवश्यक ठरल्याने ही अधिकृत स्पष्टीकरणात्मक जाहीर नोटीस दिली आहे, वरील सर्व माहिती सार्वजनिक असून ती सत्यतेसाठी मा, सहाय्यक धर्मदाय आयुक्त अहिल्यानगर येथे तपासून पाहता येईल.

**नोट :** श्री सय्यद अब्दुल मतीन अब्दुल रहीम यांनी प्रसिद्ध केलेली नोटीस व खोटी माहिती देऊन केलेली बदनामीबाबत त्यांच्या विरोधात कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे. तरी सर्व नागरिक व कर्मचारी व न्यासाचे सर्व आजीव सभासद यांना कळविण्यात येत आहे की, श्री. सय्यद अब्दुल मतीन अब्दुल रहीम यांचा अंजुमन तरक्की ए उर्दू, E २४ अहिल्यानगर या न्यासाशी कोणताही संबंध नाही व त्यांचा आदेशास कोणतीही वैधता नाही.

दि.१३/१०/२०२५
अहमदनगर

आपला : **शेख तनवीर चांद**
**सेक्रेटरी**, अंजुमन तरक्की ए उर्दू, E २४, अहमदनगर

# रस्त्याच्या दुरावस्थेने नागरिकांचा संताप; तीन तास केले रास्ता रोको, वाहतूक ठप्प

नगर – मोठ्या प्रमाणात वाहतूक असलेल्या केडगाव ते घोसपुरी रस्त्याची गेल्या अनेक दिवसांपासून प्रचंड दुर्दशा झालेली आहे. रस्ता अनेक ठिकाणी खचून मोठ मोठे खड्डे पडले आहेत. हे खड्डे चुकवताना वाहन चालकांचे अपघात होत असून खड्डयांमुळे वाहनचालकांची हाडे आणि वाहनांचे स्पेअरपार्ट खिळखिळे होत आहेत. या रस्त्याचे तातडीने मजबुतीकरण आणि रुंदीकरण करण्यात यावे, या मागणीसाठी परिसरातील ६ गावांतील ग्रामस्थांनी एकत्र येत १३ ऑक्टोबर रोजी सकाळी अकोळनेर येथील पेट्रोलियम डेपो जवळील चौकात सुमारे ३ तास रास्ता रोको आंदोलन करत संताप व्यक्त केला. यावेळी दोन्ही डेपो मधून डिझेल पेट्रोल घेवून जाणारे शेकडो टँकरच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

केडगाव घोसपुरी रस्त्यावर सोनेवाडी बायपास चौकापासून पुढे थेट घोसपुरी पर्यंत ठिकठिकाणी मोठ मोठे खड्डे पडलेले आहेत. या रस्त्यावरून प्रवास करताना वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. या रस्त्यावर सोनेवाडी, अकोळनेर भोरवाडी, जाधव वाडी, सारोळा कासार, घोसपुरी, अस्तगाव आदी गावांतील नागरिक प्रवास करत असतात. तसेच नगर शहर, केडगाव व इतर ठिकाणाहून या गावांमध्ये कार्यरत असलेले शिक्षक, अनेक शासकीय अधिकारी, कर्मचारी ही प्रवास करत असतात.

याशिवाय अकोळनेर येथील इंडियन ऑईल व भारत पेट्रोलियम या दोन कंपन्यांमधून दररोज शेकडो इंधन टँकरची ये जा सुरु असते. याशिवाय खडी वाहतूक करणारे ढंपरही दररोज रात्रंदिवस धावत असतात. या अवजड वाहनांच्या वर्दळीमुळे या रस्त्याची प्रचंड दुरवस्था झालेली आहे. त्याचा या परिसरातील गावांमधील नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. गेल्या ४–५ वर्षात या रस्त्याच्या दुर्दशेकडे बांधकाम विभागाकडून कायमच दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे परिसरातील गावांमधील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी तसेच लवकरात लवकर मजबुतीकरण, कॉंक्रीटीकरण करण्यात यावे या मागणीची निवेदने मागील आठवड्यात बांधकाम विभागाला देण्यात आली होती. अकोळनेरचे सरपंच प्रतिक शेळके यांच्या पुढाकाराने या सर्व गाबातील पदाधिकारी व ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन केले.

### ना.नितीन गडकरींना भेटणार : आ.काशिनाथ दाते

या आंदोलनाची दखल घेत बांधकाम विभागाचे अभियंता श्री. सुतार, दोन्ही पेट्रोलियम डेपोचे अधिकारी तसेच आ. काशिनाथ दाते यांनी आंदोलनस्थळी येवून निवेदन स्वीकारले. यावेळी बोलताना आ.दाते म्हणाले, बांधकाम विभागाला सूचना दिल्याने या रस्त्याच्या तातडीच्या दुरुस्ती साठी ४२ लाखांची निविदा प्रसिद्ध झालेली आहे. यातून खड्डे बुजविण्यात येतील तसेच आपण तातडीने पालकमंत्री, बांधकाम मंत्री यांच्याशी चर्चा करू तसेच या रस्त्यावर पेट्रोलियम कंपन्यांच्या टँकरची वाहतूक जास्त असल्याने या रस्त्याच्या काम ासाठी केंद्र सरकारकडून निधी मिळावा यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेवू. राज्य सरकार कडेही पाठपुरावा केला जाईल. सर्व बाजूंनी पाठपुरावा करून या रस्त्याचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढला जाईल असे आश्वासन त्यांनी दिले.

(छायाचित्र पान २ वर)

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# निवडणुकीसाठी अहिल्यानगर जिल्हा परिषद गट, पंचायत समिती गणांची 'आरक्षण सोडत' जाहीर

## नगर तालुक्यात ३ माजी सदस्यांचे गट झाले राखीव, तर दोघांच्या गटात सोयीचे आरक्षण

नगर - अहिल्यानगर जिल्हा परिषद गटांचे आणि पंचायत समिती गणांचे आरक्षण सोडतीद्वारे काढण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा परिषदेच्या सर्व गटांचे आरक्षण सोडत काढण्यात आली. तर तहसील कार्यालय स्तरावर पंचायत समिती गणांच्या आरक्षणाची सोडत काढण्यात आली. यामध्ये अनेकांच्या मनाप्रमाणे आरक्षण निघाले तर काहींना इतर गट शोधावे लागणार आहेत.



जिल्हाधिकारी पंकज आशिया, उपजिल्हाधिकारी शारदा जाधव, सहाय्यक महसूल तहसीलदार शरद घोरपडे, सहाय्यक महसूल अधिकारी नीता कदम, वैशाली कळमकर यांच्या उपस्थितीत बोल्हेगाव येथील ४ वर्षीय बालिकेच्या हस्ते चिठ्ठी काढून ही सोडत काढण्यात आली. या सोडतीनंतर जिल्ह्यात ठिकठिकाणी कही ख़ुशी, कही गम असे वातावरण दिसून आले. अहिल्यानगर तालुक्यात माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले यांचा दरेवाडी तर शरद झोडगे यांचा नागरदेवळे हे दोन्ही गट अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव झाले आहेत. तर प्रताप शेळके यांचा नवनागापूर गट सर्वसाधारण महिलेसाठी राखीव झाला आहे. त्यामुळे या तिघांना पर्यायी गट शोधावे लागणार आहेत. बाळासाहेब हराळ यांचा वाळकी आणि माधवराव लामखडे यांचा निंबळक हे दोन्ही गट नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी राखीव झालेले आहेत.त्यामुळे दोघांनाही पुन्हा निवडणूक रिंगणात उतरणे सोपे झाले आहे.

गट आणि गणांचे आरक्षण जाहीर झाल्यामुळे निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांकडून आता तयारीला वेग येणार असून ऐन दिवाळीत निवडणुकीची रणधुमाळी सुरु होणार आहे.

### जिल्हा परिषद गटांचे आरक्षण - अकोले तालुका

| अ.क्र. | गटाचे नाव | आरक्षण |
|---|---|---|
| १ | समशेरपूर | अनुसूचित जमाती |
| २ | देवठाण | अनुसूचित जमाती महिला |
| ३ | धामणगाव आवारी | सर्वसाधारण महिला |
| ४ | राजूर | अनुसूचित जमाती |
| ५ | सातेवाडी | अनुसूचित जमाती महिला |
| ६ | कोतूळ | अनुसूचित जमाती |

### जिल्हा परिषद गटांचे आरक्षण - कोपरगाव तालुका

| अ.क्र. | गटाचे नाव | आरक्षण |
|---|---|---|
| १ | सुरेगाव | ना.मा.प्र. महिला |
| २ | ब्राह्मणगाव | सर्वसाधारण |
| ३ | संवत्सर | सर्वसाधारण |
| ४ | शिंगणापूर | ना.मा.प्र. महिला |
| ५ | पोहेगाव बु. | सर्वसाधारण महिला |

### जिल्हा परिषद गटांचे आरक्षण - श्रीगोंदा तालुका

| अ.क्र. | गटाचे नाव | आरक्षण |
|---|---|---|
| १ | येळपणे | सर्वसाधारण |
| २ | कोळगाव | सर्वसाधारण |
| ३ | मांडवगण | सर्वसाधारण महिला |
| ४ | आढळगाव | सर्वसाधारण महिला |
| ५ | बेलवंडी | सर्वसाधारण |
| ६ | काष्टी | ना.मा.प्र. |

### जिल्हा परिषद गटांचे आरक्षण - श्रीरामपूर तालुका

| अ.क्र. | गटाचे नाव | आरक्षण |
|---|---|---|
| १ | उंदिरगाव | अनुसूचित जाती महिला |
| २ | टाकळीभान | सर्वसाधारण महिला |
| ३ | दत्तनगर | अनुसूचित जाती |
| ४ | बेलापूर बु. | अनुसूचित जाती महिला |

### जिल्हा परिषद गटांचे आरक्षण - कर्जत तालुका

| अ.क्र. | गटाचे नाव | आरक्षण |
|---|---|---|
| १ | मिरजगाव | सर्वसाधारण |
| २ | चापडगाव | सर्वसाधारण महिला |
| ३ | कुळधरण | ना.मा.प्र. |
| ४ | कोरेगाव | सर्वसाधारण महिला |
| ५ | राशीन | ना.मा.प्र. |

### जिल्हा परिषद गटांचे आरक्षण - संगमनेर तालुका

| अ.क्र. | गटाचे नाव | आरक्षण |
|---|---|---|
| १ | समनापूर | ना.मा.प्र. महिला |
| २ | तळेगाव | सर्वसाधारण महिला |
| ३ | आश्वी बु. | ना.मा.प्र. महिला |
| ४ | जोर्वे | ना.मा.प्र. |
| ५ | घुलेवाडी | सर्वसाधारण |
| ६ | धांदरफळ | सर्वसाधारण |
| ७ | चंदनापुरी | ना.मा.प्र. |
| ८ | बोटा | अनुसूचित जमाती महिला |
| ९ | साकूर | सर्वसाधारण |

### जिल्हा परिषद गटांचे आरक्षण - जामखेड तालुका

| अ.क्र. | गटाचे नाव | आरक्षण |
|---|---|---|
| १ | साकत | सर्वसाधारण |
| २ | खर्डा | सर्वसाधारण |
| ३ | जवळा | ना.मा.प्र. महिला |

### जिल्हा परिषद गटांचे आरक्षण - नेवासा तालुका

| अ.क्र. | गटाचे नाव | आरक्षण |
|---|---|---|
| १ | बेलपिंपळगाव | सर्वसाधारण महिला |
| २ | कुकाणा | सर्वसाधारण महिला |
| ३ | भेंडा बु. | सर्वसाधारण |
| ४ | भानस हिवरा | सर्वसाधारण |
| ५ | खरवंडी | सर्वसाधारण महिला |
| ६ | सोनई | ना.मा.प्र. महिला |
| ७ | चांदा | सर्वसाधारण महिला |

### जिल्हा परिषद गटांचे आरक्षण - अहिल्यानगर तालुका

| अ.क्र. | गटाचे नाव | आरक्षण |
|---|---|---|
| १ | नवनागापूर | सर्वसाधारण महिला |
| २ | जेऊर | ना.मा.प्र. महिला |
| ३ | नागरदेवळे | अनुसूचित जाती महिला |
| ४ | दरेवाडी | अनुसूचित जाती महिला |
| ५ | निंबळक | ना.मा.प्र. |
| ६ | वाळकी | ना.मा.प्र. |

### जिल्हा परिषद गटांचे आरक्षण - शेवगाव तालुका

| अ.क्र. | गटाचे नाव | आरक्षण |
|---|---|---|
| १ | दहिगाव ने | सर्वसाधारण |
| २ | बोधेगाव | सर्वसाधारण |
| ३ | भातकुडगाव | अनुसूचित जाती महिला |
| ४ | लाडजळगाव | ना.मा.प्र. महिला |

### जिल्हा परिषद गटांचे आरक्षण - पाथर्डी तालुका

| अ.क्र. | गटाचे नाव | आरक्षण |
|---|---|---|
| १ | कासार पिंपळगाव | सर्वसाधारण |
| २ | भालगाव | सर्वसाधारण |
| ३ | तिसगाव | सर्वसाधारण |
| ४ | मिरी | सर्वसाधारण महिला |
| ५ | टाकळीमानूर | सर्वसाधारण महिला |

### जिल्हा परिषद गटांचे आरक्षण - राहाता तालुका

| अ.क्र. | गटाचे नाव | आरक्षण |
|---|---|---|
| १ | पुणतांबा | अनुसूचित जाती |
| २ | वाकडी | अनुसूचित जाती |
| ३ | साकुरी | अनुसूचित जाती महिला |
| ४ | लोणी खु. | ना.मा.प्र. |
| ५ | कोल्हार बु | सर्वसाधारण |

### जिल्हा परिषद गटांचे आरक्षण - राहुरी तालुका

| अ.क्र. | गटाचे नाव | आरक्षण |
|---|---|---|
| १ | टाकळीमियाँ | ना.मा.प्र. महिला |
| २ | ब्राह्मणी | सर्वसाधारण |
| ३ | गुहा | सर्वसाधारण |
| ४ | बारागाव नांदूर | अनुसूचित जमाती महिला |
| ५ | वांबोरी | सर्वसाधारण महिला |

### जिल्हा परिषद गटांचे आरक्षण - पारनेर तालुका

| अ.क्र. | गटाचे नाव | आरक्षण |
|---|---|---|
| १ | टाकळी ढोकेश्वर | सर्वसाधारण महिला |
| २ | ढवळपुरी | सर्वसाधारण महिला |
| ३ | जवळा | ना.मा.प्र. |
| ४ | निघोज | ना.मा.प्र. |
| ५ | सुपा | ना.मा.प्र. महिला |

### पंचायत समिती गण आरक्षण : अहिल्यानगर

| अ.क्र. | गटाचे नाव | आरक्षण |
|---|---|---|
| १ | देहरे | ना.मा.प्र. |
| २ | नवनागापूर | सर्वसाधारण महिला |
| ३ | जेऊर | ना.मा.प्र. महिला |
| ४ | बुऱ्हाणनगर | ना.मा.प्र. महिला |
| ५ | नागरदेवळे | अनुसूचित जाती |
| ६ | केकती | सर्वसाधारण महिला |
| ७ | दरेवाडी | अनुसूचित जाती महिला |
| ८ | चिचोंडी पाटील | सर्वसाधारण |
| ९ | निंबळक | सर्वसाधारण महिला |
| १० | चास | सर्वसाधारण |
| ११ | वाळकी | सर्वसाधारण |
| १२ | गुंडेगाव | सर्वसाधारण |



केडगाव - घोसपुरी रस्त्याच्या कामासाठी ६ गावांनी अकोळनेर येथे रास्ता रोको आंदोलन केले, त्यावेळी त्यांचे निवेदन स्विकारताना आ.काशिनाथ दाते व बांधकाम विभागाचे अधिकारी.

## हरीदेवी लुल्ला यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - हेरिटेज अपार्टमेंट स्टेशन रोड येथील रहिवासी हरीदेवी बच्चुमल लुल्ला (वय ८५) यांचे १३ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ७ मुली, ३ मुले, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सर्जेपूरा येथील हितेश मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्सचे संचालक सुरेश, कमलेश, हरिष लुल्ला यांच्या त्या मातोश्री होत.

## भिमाबाई बडाख यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सारसनगर येथील रहिवासी गं.भा. भिमाबाई जगन्नाथ बडाख पा. (वय ७८) यांचे १२ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दीपक, संदीप, सचिन बडाख यांच्या त्या मातोश्री होत.

## मनिषा गुंदेचा यांचे हृदयविकाराने निधन



नगर - नंदू-बंधू इमारत कंपनी येथील रहिवासी सौ. मनिषा विजय गुंदेचा (वय ५८) यांचे ११ ऑक्टोबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, २ मुली, १ मुलगा, जावई, जावा, नाती, दीर असा परिवार आहे. ओम गुंदेचा यांच्या त्या मातोश्री होत.

## संजय सुराणा यांचे अपघाती निधन



नगर - येथील व्यापारी संजय कचरदास सुराणा (वय ५३) यांचे ११ ऑक्टोबर रोजी अपघाती निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगी, १ मुलगा, आई, वडील, पत्नी, १ भाऊ असा परिवार आहे.

## प्रकाश गांधी यांचे अमेरिकेत निधन



नगर - नंदनवन कॉलनीतील रहिवासी प्रकाश नवलमल गांधी (वय ७८) यांचे १० ऑक्टोबर रोजी अमेरिका येथील फिनिक्स येथे निधन झाले. त्यांच्यावर अमेरिका येथे अंत्यविधी करण्यात आला. त्यांच्यामागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. प्रिया व प्रितम यांचे ते वडील, सुभाष, डॉ. राजकुमार, सौ. शशिकला यांचे मोठे बंधू तर निर्मल, अमित सुनील यांचे चुलते होत.


## विमलाबाई सगम यांचे अल्प आजाराने निधन



नगर - पद्मशाली वधुवरच्या मार्गदर्शक श्रीमती विमलाबाई बबनराव सगम (वय ८९) यांचे १२ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, ७ मुली, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंट्याल यांच्या त्या सासु तर माजी नगराध्यक्षा सौ. संगीता गोरंट्याल यांच्या मातोश्री होत.

## सिमा मेहेत्रे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी सिमा मेहेत्रे (वय २४) यांचे १२ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे वडील, १ भाऊ, १ बहिण असा परिवार आहे. त्या येथील व्यापारी रमेश नामदेव मेहेत्रे यांची मुलगी होत.

## सौ. सुनंदा डीघोळे यांचे आजाराने निधन



नगर - येथील एन-६, आविष्कार कॉलनी, छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी सौ. सुनंदा कडुबा डीघोळे (वय ४७) यांचे १० ऑक्टोबर रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर एन -६ येथील स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुलगी व मुलगा असा परिवार आहे.

## विनोद रोहेरा यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील मेनरोड येथील जीवन रेडिओ हाऊसचे मालक व लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष विनोद भरतलाल रोहेरा (वय ६३) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, तीन भाऊ, मुलगा, मुलगी, पुतणे, जावई, नातू असा परिवार आहे. सुनिल, सुशिल व दिनेश रोहेरा यांचे थोरले बंधू, अंकुश रोहेरा यांचे वडील होत.

## ज्येष्ठ रणजीपटू वसंत उर्फ बाबा चांदोरकर यांचे निधन



नगर - जुन्या पिढीतील अष्टपैलू रणजी क्रिकेटपटू व नगरचे उद्योजक वसंत उर्फ बाबा चांदोरकर (वय ९२) यांचे ११ ऑक्टोबर रोजी वृध्दापकाळाने रहात्या घरी निधन झाले. त्यांच्यावर अहिल्यानगरमधील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले (दीपक व पंकज) व नातवंडे असा परिवार आहे. अहमदनगर शहकर सहकारी बँकेच्या माजी संचालिका कांचनमाला चांदोरकर यांचे ते पती होत.

स्बाबा चांदोरकर यांनी क्रिकेट क्षेत्रात बहुमोल योगदान दिले. रणजी सामन्यांमध्ये बॉलर व बॅट्समन अशी उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरी त्यांनी केली होती. अनेक सामन्यांमध्ये त्यांनी उत्कृष्ट खेळ केला. महाराष्ट्र क्रिकेट निवड समितीचे चेअरमन म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते. औद्योगिक क्षेत्रातही त्यांनी योगदान देत अल्विन कॅरॅमेल कलर्स इंडिया कंपनी त्यांनी सुरु केली.

बाबा चांदोरकर हे उत्कृष्ट लेखक म्हणूनही परिचित होते. तसेच समाजातील विविध घटकांना मार्गदर्शन व मदत त्यांनी आयुष्यभर केली.

# राज्यात १५ ऑक्टोबरपासून वादळी पावसाचा अंदाज

## शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके पाऊस, वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावी

मुंबई - गेल्या काही दिवसांपासून राज्यातील हवामान पूर्णपणे कोरडे आहे आणि नैऋत्य मान्सूनने राज्यातून निरोप घेतला आहे. मात्र, १५ ऑक्टोबर पासून राज्यातील हवामानात परत एकदा बदल अपेक्षित असून किमान १८ ऑक्टोबरपर्यंत विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात ढगाळ हवामान आणि दुपारनंतर वादळी पाऊस अपेक्षित आहे.

सध्याच्या अंदाजानुसार वादळी पावसाची सर्वाधिक शक्यता आणि प्रमाण हे विदर्भ आणि मराठवाड्यात असू शकते, जिथे या दरम्यान अनेक भागांमध्ये ढगाळ हवामान अथवा वादळी पावसाची शक्यता राहील. तुलनेत खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात विखुरलेल्या स्वरूपाचा वादळी पाऊस पडू शकतो.

शेतकऱ्यांनी हवामानाच्या स्थितीनुसार नियोजन करावे आणि काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

# बाजारपेठेत विजेचा लपंडाव

(पान १ वरुन)

चालणारी विविध उपकरणे बंद पडत आहेत. त्यामुळे व्यापारी वर्ग तसेच खरेदीसाठी आलेल्या नागरिकांनाही प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

दर शनिवारी महावितरणकडून देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली दिवसभर भारनियमन केले जाते. या संदर्भात व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाने आ. जगताप यांच्यासमवेत महावितरणच्या अधिक्षक अभियंत्यांना निवेदन देवून सणासुदीच्या काळात भारनियमन करू नये, अशी मागणी केली होती. अधिकाऱ्यांनीही भारनियमन न करण्याचे आश्वासन दिले होते. असे असतानाही गेल्या शनिवारी अनेक भागात वीजपुरवठा खंडित झाला होता. त्यात भर म्हणून आता तर अतिशय कमी दाबाने वीज पुरवठा व विजेचा लपंडाव सुरु झाला असल्याने व्यापारी वर्ग प्रचंड त्रस्त झाला आहे. ऐन सणासुदीच्या काळात सुरु असलेला हा विजेचा लपंडाव त्वरित थांबवावा आणि पुरेशा दाबाने वीज पुरवठा करण्यात यावा, अशी मागणी नागरिक, व्यापाऱ्यांकडून केली जात आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# युवकांनी राष्ट्र प्रेमाने प्रेरित होऊन कार्य करावे

**पंडित दिनदयाळ व्याख्यानमालेत विश्वास नांगरे पाटील यांचे प्रतिपादन; महाभारतातील 'मै समय हू' या आवाजाने सभागृह दणाणले**

नगर - पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची समर्पित करण्याची वृत्ती एकात्म मानवतावाद व प्रखर राष्ट्रवाद यांच्या विचार प्रेरणादायी आहेत. तळागाळातील लोकांच्या आर्थिक उन्नतीसाठी तसेच शेवटच्या घटकांपर्यंत कार्य करण्यासाठी पंडित दिनदयाळ पतसंस्थेचे कार्य कौतुकास्पद आहे. राज्यात ओल्या दुष्काळाने थैमान घातले आहे.शेतकरी राजाला आधार देण्याची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाच्या सोळाव्या वर्षी शंकराच्या पिंडीला अभिषेक करून स्वराज्याचे तोरण बांधले. स्वामी विवेकानंदांनी शिकागो येथील धर्म परिषदेत उदारमतवादाने प्रेरित झालेला वसुधैव कुटुम्बकम हा संदेश दिला. भगवद्गीतेचे सुंदर निरूपण म्हणजे ज्ञानेश्वरी, संत ज्ञानेश्वरांनी पसायदानातून जगाला विश्वशांतीचा संदेश दिला.या भारताचे आपण नागरिक आहोत. युवकांनो जीवनात यशस्वी होण्यासाठी आदर्श निवडणे ही सर्वात महत्त्वाची भूमिका ठरवते. रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, अहिल्यादेवी होळकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पंडित दीनदयाळ उपाध्याय हे आपले आदर्श असले पाहिजेत. विद्यार्थी दशाही साधना करण्यासाठी आहे.चांगल्या सवयी चा स्वीकार करून चारित्र्यसंपन्न राहुन परोपकार करण्याची वृत्ती जोपासण्यास जीवन परिपूर्ण होते. जीवन हे संघर्षमय आहे. जीवनात उच्च ध्येय ठेवून त्याचा पाठलाग करायला शिका. प्रतिकूल परिस्थितीला मात करण्यासाठी स्वतःला समर्थ बनवा. आई-वडिलांचे कष्ट विसरू नका.स्वतःला सिद्ध करण्यासाठी जिद्द आणि मेहनतीने यश मिळण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावा.युवकांनी राष्ट्र प्रेमाने प्रेरित होऊन कार्य करावे, असे प्रतिपादन अतिरिक्त पोलीस महासंचालक (लाचलुचपत प्रतिबंध विभाग मुंबई) विश्वास नांगरे पाटील यांनी केले आहे.



पंडित दीनदयाळ पतसंस्था व पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रप्रेम युवकांच्या स्वप्नांची प्रेरणा विषयावर व्याख्यान देताना विश्वास नांगरे पाटील.

सावेडी येथील माऊली सभागृहात पंडित दीनदयाळ पतसंस्था व पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रप्रेम युवकांच्या स्वप्नांची प्रेरणा या विषयावर विश्वास नांगरे पाटील यांनी व्याख्यान दिले. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत चित्रपट निर्माते, महाभारत मालिकेतील मै समय हू प्रसिद्ध आवाज ज्यांचा आहे आणि हरीश भिमाणी, लेखिका सुधाताई कांकरिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, रा.स्व.संघाचे जिल्हा संघचालक वाल्मीक कुलकर्णी, मिलिंद कोलते, पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन वसंत लोढा, मानद सचिव विकास पाथरकर, ज्येष्ठ संचालक मिलिंद गंधे, दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय तागडे, महासचिव बाळासाहेब भुजबळ, संचालक निलेश लोढा, बाबासाहेब साठे, श्रीमती शैला चंगेडे, सौ.शारदा होशींग, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, उपाध्यक्ष अशोक कानडे, सीए राजेंद्र काळे, कुलकर्णी ज्ञानेश, राजकुमार जोशी, डॉ.शरद कोलते, प्रमोद कांबळे, राजेंद्र चोपडा, केके शेट्टी, अजित कृष्णन, डॉ.प्रकाश कांकरिया, अनिरुद्ध देवचक्के, मुकुल गंधे, गजेंद्र सोनवणे आदी उपस्थित होते.

नांगरे पाटील पुढे म्हणाले, तरुणांनी सोशल मीडियाच्या जमान्यात रील स्टार, टिक टॉक स्टार, पब्जी ही आपली आदर्श नाहीत. मोबाईलचा अनावश्यक वापर टाळावा. गावातील गणेश मंडळांनी वर्गणीच्या माध्यमातून पुस्तके दिली.त्याचे वाचन व अभ्यास करून स्पर्धा परीक्षा देऊन यश मिळविले आहे.

चित्रपट निर्माते हरीश भिमाणी म्हणाले, आपल्या देशात करोडो देव आहेत.तसेच हजारो मंदिरे आहेत. परंतु भारत मातेचे मंदिर नागपूर येथील रा.स्व संघाचे कार्यालय येथेच पाहायला मिळते.नमस्ते सदा वत्सले मातृभूमेया संघाच्या प्रार्थनेत हे मातृभूमी मी तुला नमन करतो.तुझे वात्सल्य आईप्रमाणे मला मिळो. असा भावार्थ सांगितलेला आहे. आत्तापर्यंत ३८ संस्कृत अल्बम चे रेकॉर्ड देशांमध्ये केलेले आहे. तसेच स्वर व्यवसायाने व्यवसायाने भागवत गीतेचा रेकॉर्डिंग चार भाषेत करता आले आहे. प्रत्येक भारतीय नागरिकाने देशाचा हिस्सा समजून प्रत्येकाने प्रगती केल्यास देशाची प्रगती होईल.

वसंत लोढा प्रास्ताविकात म्हणाले, गेल्या पस्तीस वर्षापासून पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचाराने प्रेरित होऊन समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पत उंचावण्याचे कार्य सुरू आहे. पंडितजींनी सांगितल्याप्रमाणे मै अपने लिये नही, अपनों के लिए हु. एकात्म मानवतावाद हा सिद्धांत त्यांनी मांडला आहे. पतसंस्थेच्या आजपर्यंत ८० कोटीच्या ठेवी आहेत. रा.स्व.संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त पतसंस्थेने शंभर कोटींचे उद्दिष्ट ठेवले आहे. ते पार करण्यासाठी उपस्थितांचा प्रतिसाद मिळत आहे.

सूत्रसंचलन शारदा होशिंग यांनी केले. पंडित दीनदयाळ प्रतिष्ठानचे सचिव बाळासाहेब भुजबळ यांनी आभार मानले. ताज हॉटेल येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्याचे भीषण विदारक चित्र स्पष्ट करताना विश्वास नांगरे पाटील यांनी व सहकार्यांनी दाखविलेल्या अतुलनीय धाडस व शौर्यामुळे अनेकांचे प्राण वाचले. चित्रपट निर्माते हरीश भिमाणी यांनी महाभारत मालिकेतील मै समय हुया आवाजाने सभागृह दणाणून गेले.



बीड येथे होणाऱ्या ओबीसी महाएल्गार मेळाव्याच्या निमित्ताने अहिल्यानगर येथे नियोजन बैठक झाली.

# बीड येथील ओबीसी महाएल्गार मेळाव्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून समाजबांधव जाणार

**समता परिषदेचे कार्याध्यक्ष बापूसाहेब भुजबळ यांची माहिती**

नगर - बीड येथे १७ ऑक्टोबर रोजी होणारे ओबीसी महाएल्गार मेळाव्याच्या निमित्ताने अहिल्यानगर येथे नियोजन बैठक झाली. महाराष्ट्र सरकारने हैदराबाद गॅजेट्स लागू करण्याचा घेतलेला निर्णय हा ओबीसी समाजाच्या आरक्षणाला उध्वस्त करणारा निर्णय आहे. यामुळे ओबीसी समाजाच्या मनात प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे. सदर गॅजेट्स लागू करण्याचा घेतलेला निर्णय सरकारने रद्द करावा यासाठी, ओबीसी बहुजन समाजाचे नेते व महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड येथे १७ ऑक्टोबर रोजी महा एल्गार मेळावा घेण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर येथे ओबीसी महामंडळाचे माजी अध्यक्ष व समता परिषदेचे कार्याध्यक्ष बापूसाहेब भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली. यावेळी बोलताना बापूसाहेब भुजबळ म्हणाले कि अहिल्यानगर जिल्हा मधून असंख्य ओबीसी बांधवांनी मोर्चाला येण्याची तयारी सुरु केली असून या जिल्ह्यातील ओबीसी बांधव जाणार असल्याचे त्यांनी सांगितले

यावेळी समता परिषदेचे राज्य प्रचारक डॉ. नागेश गवळी, प्रदेश सरचिटणीस रवी सोनवणे, प्रदेश चिटणीस अंबादास गारुडकर, अण्णासाहेब शेलार, शरद झोडगे, प्रदेश चिटणीस अनिल निकम, प्रदेश प्रचारक मुकुंद सोनटक्के, महिला जिल्हाध्यक्षा संगीता ढवळे, कांतीलाल कोथिंबीरे, उद्योजक संजय गारुडकर, नगरसेवक रमेश गोरे, अरविंद सोनटक्के, रघुनाथ खामकर, माऊली गायकवाड, सुधाकर आव्हाड, ज्ञानदेव खराडे, रामदास फुले, भरत गारुडकर, विद्या करपे, यशवंत पानमळकर यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

महात्मा फुले समता परिषदेचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे व शहराध्यक्ष ब्रिजेश ताठे व जिल्हा कार्याध्यक्ष अर्जुन मेहेत्रे, शहर कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे, तसेच तालुकाध्यक्ष नवनाथ खामकर पारनेर, नागनाथ वाळके पाथर्डी, सुनील शिंदे जामखेड, शिवाजी राऊत श्रीगोंदा, सोमनाथ घाडगे नगर, भीमराव बनसोडे शेवगाव यांनी मेळाव्यास अहिल्यानगर जिल्ह्यातून ओबीसी समाज बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

# यशवंती मराठा महिला मंडळाच्यावतीने बालघर प्रकल्पातील बालकांना फराळचे वाटप



नगर - यशवंती मराठा महिला मंडळाच्या वतीने बालघर प्रकल्पातील वंचित व निराधार बालकांना फराळचे वाटप करुन त्यांची दिवाळी गोड करण्यात आली. समाजातील वंचित, निराधार व प्रेमासाठी आसुसलेल्या बालकांच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. या वेळी महिला मंडळाच्या सदस्यांनी बालकांसह विविध बौद्धिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक खेळांमध्ये सहभाग घेतला. खेळामधील विजेत्या मुलांना बक्षीस देऊन प्रोत्साहित करण्यात आले. याप्रसंगी संस्थापक अध्यक्षा मायाताई कोल्हे, जिल्हाध्यक्ष गीतांजली काळे, शहराध्यक्ष मीरा बारस्कर, शहर ग्रामीण अध्यक्ष रूपाली ताकटे, उपाध्यक्ष कविता दरंदले, सचिव लीना नेटके, माजी जिल्हाध्यक्ष शर्मिला कदम, उर्मिला वाळके, माजी शहराध्यक्षा आशाताई शिंदे, आरती थोरात, अर्चना बोरुडे, नंदा मुळे, लता भापकर, मेघा झावरे, मंगल शिरसाठ, मंगल शिर्के, सारिका तट, सुलक्षणा अडोळे, माजी नगरसेविका दिपाली बारस्कर, ज्योती गंधाडे, राजश्री शेळके, प्रमिलाताई सुंबे, राजश्री सालके आदींसह महिला सदस्य उपस्थित होत्या.

बालघर प्रकल्प व शांताई वृद्धाश्रमाचे संचालक युवराज गुंड यांना कर्म तपस्वी पुरस्कार मिळाल्याबद्दल मंडळाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. वंचित बालकांबरोबर दिवाळी साजरी करून समाजात संवेदनशीलतेचा, प्रेमाचा आणि एकात्मतेचा संदेश देण्यात आला.

मायाताई कोल्हे म्हणाल्या, दिवाळी म्हणजे फक्त दिवे, फराळ आणि आनंद नव्हे; ती म्हणजे आनंद वाटण्याचा सण. समाजात अजूनही अनेक मुले प्रेमाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलवणे, हेच खरी दिवाळी सणाचा आनंद आहे. प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार समाजातील वंचित घटकांच्या जीवनातील अंधकार दूर करण्यासाठी योगदान देण्याचे आवाहन केले. गीतांजली काळे म्हणाल्या की, यशवंती मराठा महिला मंडळ केवळ महिलांच्या सक्षमीकरणापुरते मर्यादित नाही, तर समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आनंद पोहोचविण्याचा प्रयत्न करत आहे. या मुलांच्या निरागस हसण्यातून सर्वांना खरी दिवाळी अनुभवायला मिळाली. आम्ही केवळ फराळ वाटला नाही, तर प्रेम, आत्मीयता वाटल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मीरा बारस्कर यांनी सांगितले की, वंचित बालकांसह साजरी केलेली दिवाळी प्रत्येकाच्या मनात कायमची कोरली जाणार आहे. दिवाळी केवळ घरात नाही, मनात उजळायला हवी. आपल्या थोड्याशा प्रयत्नाने एखाद्याचे आयुष्य उजळू शकते. यशवंती मराठा महिला मंडळ समाजसेवेच्या माध्यमातून ही दिवाळी दरवर्षी साजरी करत असल्याचे त्या म्हणाल्या.



अहमदनगर एज्यकेशन सोसायटीतर्फे करंजी येथील पूरग्रस्त ग्रामस्थांसाठी किराणामाल व संसार उपयोगी भांड्यांची किट अशा प्रत्येकी दोन किट वाटल्या.

# अहमदनगर एज्यकेशन सोसायटीतर्फे करंजी येथील पूरग्रस्तांना मदतीचा हात

नगर - अहमदनगर एज्युकेशन सोसायटी या संस्थेमार्फत प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया यांनी करंजी येथील ५० पूरग्रस्त ग्रामस्थांसाठी किराणामाल व संसार उपयोगी भांड्यांची किट अशा प्रत्येकी दोन किट वाटल्या.

या कार्यक्रमासाठी भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक उल्हास दुगड, अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापक प्रभाकर भाबड, रुपीबाई बोरा न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक अजयकुमार बारगळ, संस्थेचे कर्मचारी तथा करंजी गावचे भूमिपुत्र बाळासाहेब सुभाष साखरे यांच्यासह करंजी गावचे सरपंच नसीम शेख, उपसरपंच सुनील अकोलकर ग्रामपंचायत सदस्य बाबा गाडेकर, माजी सरपंच सुनील साखरे व माजी सभापती बाळासाहेब अकोलकर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. उत्तरेश्वर महादेव मंदिर सभागृहामध्ये हा कार्यक्रम झाला. प्रास्ताविक मुख्याध्यपक अजयकुमार बारगळ यांनी केले. करंजीचे उपसरपंच सुनील अकोलकर यांनी आभार मानले.

# हेमराज केटरर्सच्या दिवाळी फराळ महोत्सवास प्रारंभ; हायजिनची विशेष काळजी, रास्त दरात रुचकर फराळ



नगर - दिवाळीचा मोठा सण नजीक आल्याने सर्वत्र उत्साही वातावरण तयार झाले आहे. घरगुती चवीच्या दिवाळीच्या गोड तिखट फराळाचा आस्वाद घेण्याचे वेध सर्वांना लागले आहेत. नगरमध्ये केटरिंग व्यवसायात तीन दशकांपासून कार्यरत असलेल्या हेमराज केटरर्सचा दिवाळी फराळ गेल्या १६ वर्षांपासून नगरकरांची दिवाळी गोड करीत आहे. हेमराज केटरर्सने शुध्दता व गुणवत्तेचा संगम असलेला चविष्ट व रूचकर दिवाळी फराळ विक्रीसाठी उपलब्ध केला आहे. अनारसे, करंजा, लाडूसह खुसखुशीत चकली, चटकदार शेव व चिवडा, शंकरपाळे, मोहन थाळ, काजू कतली या फराळाच्या पदार्थांना मोठी मागणी आहे. शुद्ध तुपातील मिठाई सुद्धा येथील वैशिष्ट्य आहे. खजूर बर्फी, हरियाणाची मटरी दिवाळी फराळाचा गोडवा आणखी वाढविणार आहे. हेमराज केटरर्सच्या कोठी रोडवरील मुख्य दालनात फराळ विक्री सुरू झाली आहे. याठिकाणी अतिशय हायजिनिक पध्दतीने फराळ तयार केला जात आहे. रूपये किलो दराने फराळ उपलब्ध आहे, अशी माहिती हेमराज केटरर्सचे संचालिका सौ.शिला हेमराज बोरा यांनी दिली.

माहिती देताना बोरा यांनी सांगितले की, सन १९९१ पासून केटरिंग व्यवसायात उत्कृष्ट स्वादाची व गुणवत्तेची सेवा देत असताना १४श५ वर्षांपूर्वी घरगुती स्वाद व आपुलकीचा तयार दिवाळी फराळ देण्याचे ठरवले. केटरर्सने सुरुवातीपासूनच मालाच्या उत्कृष्ट दर्जाला प्राधान्य दिले आहे. यंदाही ग्राहकांना अतिशय कमी दरात नमकीन तसेच लाडू, करंजा, अनारसे, चिरोटे आदी फराळाचे पदार्थ उपलब्ध करून दिले आहेत. शंकरपाळे, लाडू, मोतीचूर, चिवडा, मसाला शेव, बाकरवडी, चिरोटे, बेसन बर्फी, पातळ पोहे चिवडा, मका चिवडा, जोधपुरी चिवडा, बंगाली चिरोटे, हरियाणा मटरी या पदार्थांना मोठी मागणी आहे. कोलकता, राजस्थान, छत्तीसगड, राजस्थान येथील कारागीर उत्तम चवीचे पदार्थ तयार करून दिवाळी अधिक लज्जतदार बनवित आहेत. सर्व पदार्थ उत्कृष्ट गुणवत्तेच्या मालापासून प्रत्यक्ष ग्राहकांसमोर ताजे तयार करून दिले जातात. ताजा फराळ अतिशय स्वच्छ, हायजेनिक वातावरणात तयार करून दिला जात असल्याने ग्राहकांना खरेदी करताना पूर्ण समाधान मिळते.

सर्वसामान्यांपासून अनेक दिग्गजांनी गौरवलेल्या हेमराज केटरर्सच्या दिवाळी फराळाला विविध कारखाने, शैक्षणिक संस्था, कामगार संघटना, शासकीय विभागाकडून मोठी मागणी असते. दिवाळीत शुभेच्छा संदेशासह हेमराज केटरर्सचे आकर्षक पॅकिंग असलेले दिवाळी फराळ बॉक्स दिले जातात. नगर शहर व जिल्हयाबरोबरच राज्याच्या विविध भागातून हेमराज दिवाळी फराळाची ऑर्डर आधीच नोंदवण्यात येते. हेमराज बोरा यांची मुले विश्वजीत व प्रसन्न बोरा या व्यवसायात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. दिवाळी फराळातील नमकीन पदार्थांसाठीचे मसाले हेमराज यांच्या पत्नी शिलाताई बोरा स्वत: तयार करतात. सूनबाई मयुरी बोरा यासुद्धा फराळ तयार करण्याच्या कामावर देखरेख ठेवून असतात.

फराळाच्या ऑर्डरसाठी ग्राहकांनी विश्वजीत बोरा (मो. ९९२१५९९२१६, ९८९०२९८८९९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ग्राहकांनी फराळ खरेदीसाठी येताना कापडी पिशवी सोबत आणावी, असे आवाहनही हेमराज केटरर्सतर्फे करण्यात आले आहे.



श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाच्या वतीने उत्साहात आणि भक्तीभावाने ३२ आगम ची शोभायात्रा काढण्यात आली. या वेळी भगवान महावीर स्वामींच्या आगमसूत्रांच्या धार्मिक पूजनानंतर आगम दिंडी भक्ति भाव अनी जल्लोषात निघाली. संपूर्ण परिसर जय महावीर - जय आनंदच्या घोषणांनी दुमदुमला.

# केडगावमध्ये जैन- ३२ आगम दिंडी सोहळा उत्साहात

**समाजबांधवांचा सहभाग, भगवान महावीर स्वामींच्या ३२ आगमसूत्रांचे पूजन**

नगर - केडगाव येथील श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाच्या वतीने उत्साहात आणि भक्तीभावाने ३२ आगम ची शोभायात्रा काढण्यात आली. या वेळी भगवान महावीर स्वामींच्या आगमसूत्रांच्या धार्मिक पूजनानंतर आगम दिंडी भक्ति भाव अनी जल्लोषात निघाली. संपूर्ण परिसर जय महावीर - जय आनंदच्या घोषणांनी दुमदुमला.

चातुर्मासाच्या पवित्र निमित्ताने हा धार्मिक सोहळा महासतीजी दिव्यदर्शनाजी व पुनीतदर्शनाजी म.सा. यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाखाली पार पडला. या सोहळ्याचे यजमानपद सौ. सुवर्णा सोहनलालजी, सुयश, सौ. पुजा सार्थक बरमेचा परिवाराच्या वतीने स्वीकारण्यात आले होते.

सोहनलाल बरमेचा परिवाराने दोन दिवस आगमची धार्मिक सेवा केली. या कालावधीत त्यांनी केडगाव जैन समाजातील सर्व परिवारांचे आदरातिथ्य करून त्यांचे स्वागत केले. भगवान महावीर स्वामींच्या आगमपूजनाचा सोहळा भक्तिभावाने पार पडला.

अंबिकानगर परिसरातून निघालेल्या शोभायात्रेने संपूर्ण परिसर भक्तीमय बनले होते. या प्रसंगी जैन समाजातील महिला व पुरुष वर्गाने उपस्थिती लावली होती. यावेळी श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे सर्व मान्यवर तसेच चातुर्मास कमिटी अध्यक्ष अतुल शिंगवी, उपाध्यक्ष मयूर चोरडिया, मधुर बोकरिया, सेक्रेटरी रुपेश गुगळे, सहसेक्रेटरी विपुल कांकरिया, ललित गुगळे, सह खजिनदार राहुल शेटिया, पारस शेटिया, परेश बलदोटा, प्रकाश बड़ेरा, अनी बरमेचा परिवार, श्री आनंद आशीष प्रार्थना मंडल आदी उपस्थित होते.

या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी जैन श्रावक संघाचे ज्येष्ठ सदस्य, चातुर्मास कमिटीचे पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले. समाजातील सर्वस्तरातील बांधवांनी एकत्रित या धार्मिक सोहळ्यात सहभाग घेत भक्तिभाव, श्रध्देचे दर्शन घडविले.

# जैन सोशल फेडरेशन संचलित दिवाळी फराळ महोत्सवाला प्रारंभ



जैन सोशल फेडरेशन संचलित महावीर भवनच्या दिवाळी फराळ महोत्सवाला प्रारंभ करण्यात आला.

नगर - जैन सोशल फेडरेशन संचलित भगवान महावीर भवनात सलग १२ व्या वर्षी दिवाळी फराळ महोत्सवाला प्रारंभ झाला. या महोत्सवाचे उद्घाटन नागपूर येथील उद्योजक उमेश पगारिया यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पोपटलाल सुराणा, बसंतीलाल गोलेचा (नागपूर), केसरीमल छाजेड, जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, सतीश बोथरा, सतीश लोढा, मिलापचंद पटवा, अमित पटवा, रुपेश पटवा, प्रकाश पटवा, आनंदऋषीजी नेत्रालय मेडिकलचे संचालक डॉ. अशोक महाडिक, गिरीश गांधी, तुषार मुनोत, आर्यन पटवा व अर्पित पटवा आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात मिलापचंद पटवा म्हणाले की, सर्वसामान्यांना घरगुती दर्जाचा, हायजेनिक आणि स्वादिष्ट फराळ सहज मिळावा या हेतूने ही संकल्पना राबवली आहे. कच्च्या मालाच्या किंमती वाढल्या असल्या तरी, आम्ही ना नफा ना तोटा तत्त्वावर फराळ विक्री करत आहोत. बुंदीचे लाडू, मसाला शेव, चिवडा, शंकरपाळे, सोनपापडी हे सर्व फक्त १५० रुपये प्रति किलो दराने उपलब्ध आहेत. नगरकरांचा प्रतिसादच या उपक्रमाला आज १२ वर्षांचा सुवर्ण प्रवास घडवून आणत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संतोष बोथरा म्हणाले की, आचार्यश्री आनंदऋषीजी महाराज यांच्या आशीर्वादाने आणि प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने आम्ही हा उपक्रम सुरू केला. हे केवळ फराळ विक्रीचे ठिकाण नाही, तर सेवा आणि आपुलकीचा प्रसाद आहे. प्रत्येक ग्राहकाच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद, त्याच्या डोळ्यातील चमक हीच आमच्यासाठी खरी कमाई असल्याचे त्यांनी सांगितले.

उद्योजक उमेश पगारिया म्हणाले की, दिवाळी म्हणजे केवळ दिवे आणि फटाके नव्हेत; ती म्हणजे मनं जोडणारा, प्रेम आणि आपुलकीचा सण. महावीर भवनात चालणारा हा फराळ महोत्सव या सणाला खरी सामाजिक जोड देतो. मागील १२ वर्षांपासून हे कार्य ज्या सातत्याने आणि निष्ठेने सुरू आहे, ते पाहून मन आनंदित होतं. ना नफा, ना तोटा! या तत्त्वावर सर्वसामान्यांना दर्जेदार फराळ मिळवून देणं ही खऱ्या अर्थाने सामाजिक भावना आहे. आजच्या युगात नफ्याच्या स्पर्धेतही अशा सेवा उपक्रमांनी समाजात विश्वास, संवेदना आणि मानवतेचा जिव्हाळा जिवंत ठेवला आहे. या उपक्रमाद्वारे सकारात्मक ऊर्जा पसरते आणि अनेकांना प्रामाणिकपणे काम करण्याची प्रेरणा मिळत असल्याचे ते म्हणाले.

संपूर्ण फराळ उच्च प्रतीच्या किराण्यापासून आणि हायजेनिक वातावरणात तयार करण्यात आला आहे. नगरकरांना चांगल्या दर्जाचा फराळ मिळावा म्हणून आमची संपूर्ण टीम दिवस-रात्र परिश्रम घेत आहे. १२ वर्षांपूर्वी सुरू केलेला हा उपक्रम नगरकरांच्या प्रेमामुळे यशस्वीपणे पुढे सुरु असल्याचे रुपेश पटवा आणि अमित पटवा यांनी सांगितले.

# अहिल्यानगरमध्ये राज्यस्तरीय आंतरजिल्हा बॅडमिंटन स्पर्धेस सुरवात



योनेक्स सनराईज महाराष्ट्र सब –ज्युनिअर राज्यस्तरीय आंतरजिल्हा बॅडमिंटन स्पर्धांचे उद्‌घाटन करताना आ. संग्राम जगताप व जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.अशोक कोठारी.

नगर – अहिल्यानगर शहरातील वाडियापार्क येथील बॅडमिंटन हॉलमध्ये बॅटल डोअर स्पोर्ट्स ॲक्ॅडमीच्या वतीने आयोजित योनेक्स सनराईझ महाराष्ट्र सब –ज्युनियर राज्यस्तरीय आंतर जिल्हा बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन आ. संग्राम जगताप व जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.अशोक कोठारी यांनी झाडाला पाणी घालून केले. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, राज्य बॅडमिंटन संघटनेचे सचिव सिद्धार्थ पाटील, स्पर्धेचे संयोजक मिलिंद कुलकर्णी, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे सचिव शैलेश गवळी, योनेक्स सनराई ज कंपनीचे बालकिसन चौधरी, बॅडमिंटन संघटनेचे खजिनदार राहुल मोटे, मल्हार कुलकर्णी आदींसह पदाधिकारी, पंच, प्रशिक्षक व राज्यातून आलेले खेळाडू उपस्थित होते.


सिद्धार्थ पाटील म्हणाले, गेल्या तीन वर्षापासून नगर जिल्हा या स्पर्धेचे आव्हान पेलत उत्कृष्ट स्पर्धांचे आयोजन करत आहे. आता राज्यातील बॅडमिंटन खेळाडूंना जास्तीत जास्त संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी वर्षातून तीन वेळा वेगवेगळ्या टूर्नामेंटचे आयोजन करीत आहोत. तसेच स्पर्धेत पारदर्शीपणा यावा यासाठी ओपन ड्रॉची पद्धत सुरू केली आहे. अहिल्यानगर मधील वाडियापार्क बॅडमिंटन हॉल अतिशय उत्कृष्ट आहे, या हॉलमध्ये अधिक सुविधा उपलब्ध केल्यास राष्ट्रीयस्तरावरील मॅचेस येथे होऊ शकतात. यासाठी आमदार जगताप यांनी पुढाकार घ्यावा.

ज्ञानेश्वर खुरंगे म्हणाले, नगरमध्ये क्रीडा क्षेत्रासाठी चांगले वातावरण आहे. आमदार जगताप यांच्या सहकार्यामुळे उपलब्ध झालेल्या विकास निधीतून लवकरच बॅडमिंटन हॉलचे नूतनीकरणाचे काम सुरू करणार असून या हॉलचे नवे अत्याधुनिक रूप देण्यात येणार आहे, असे सांगितले.

प्रस्ताविक मिलिंद कुलकर्णी यांनी केले. अशोक कोठारी यांनी आभार मानले. यावेळी माजी नगरसेवक संजय चोपडा, शिवाजी चव्हाण, क्रीडा प्रशिक्षक निलेश मदने, ओंकार पर्वते, प्रथमेश व्यवहारे, शिवम खेडकर, वरून भालेराव, देव अग्रवाल, भाऊ झरेकर, मुख्य पंच विश्वास देसवंडीकर उपस्थित होते. उद्धव काळापहाड यांनी सूत्रसंचालन केले.

# पुणे विभागीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत नगर येथील हर्ष घाडगे यास विजेतेपद

## श्रीराज इंगळे याचीही चमकदार कामगिरी





नगर – नुकत्याच लोणीकंद (पुणे) येथे आयोजित केलेल्या शालेय विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत १७ वर्ष वयोगटमध्ये नगरच्या हर्ष घाडगे याने संपूर्ण स्पर्धेत अपराजित राहून ६ पैकी ५ गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. हर्ष हा पेमराज सारडा महाविद्यालयाचा विद्यार्थी असून त्याची महाराष्ट्र राज्य शालेय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच श्रीराज इंगळे याने १९ वर्ष वयोगटमध्ये ६ पैकी ४.५ गुण संपादन करून ५ वा क्रमांक प्राप्त केला असून त्याचीही निवड महाराष्ट्र राज्य शालेय बुद्धिबळ स्पर्धेसाठी झाली आहे. श्रीराज हा डॉ. न.ज. पाऊलबुद्धे कॉलेज चा विद्यार्थी आहे.

हर्ष आणि श्रीराज यास बुद्धिबळ प्रशिक्षक प्रकाश गुजराथी आणि विशाल गुजराथी यांचे मार्गदर्शन मिळाले. पुणे विभागीय शालेय बुद्धिबळ स्पर्धा या नेहमीच अतंत्य चुरशीच्या होत असतात त्यात एकुण २१० खेळाडूंचा सहभाग होता. हर्ष आणि श्रीराज याने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी कौतुकास्पद कामगिरी केली आहे.

त्यांच्या या यशाबद्दल त्याचे कौतुक होत असून जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनीही अभिनंदन केले.

# 'द आयकॉन पब्लिक स्कूल' मधील खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या आंतरशालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत द आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करून विभागीय स्तरावर निवड मिळवली आहे. नगर येथील वडिया पार्क मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत, १७ वर्षे वयोगटात भार्गव पिंपळे ह्याने ८०० मीटर धावण्यामध्ये द्वितीय तसेच लाँग जंपमध्ये तृतीय क्रमांक पटकावला. तसेचसुनिधी पटारे हिने गोळाफेकमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. १४ वर्षे वयोगटात ऋषिका वांडेकर हिने २०० मीटर धावण्यामध्ये तृतीय क्रमांक पटकावून शाळेचा मान वाढवला.

या सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडा शिक्षक व थलेटिक्स कोच जॉर्ज थोरात यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेच्या संचालिका आराधना राणा व मुख्याध्यापिका दीपिका नगरवाला यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

शरद मुथा एज्युकेशन सोसायटीच्या अंतर्गत चालवलेले द आयकॉन पब्लिक स्कूल हे अहिल्यानगरच्या मध्यवर्ती भागात स्थित सीबीएसई मान्यताप्राप्त विद्यालय आहे. नर्सरीपासून इयत्ता बारावीपर्यंत दर्जेदार शिक्षण देणारी ही संस्था आहे



विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेले आयकॉन पब्लिक स्कूलचे खेळाडू.



सिद्धीबाग ज्युडो हॉलमध्ये अहिल्यानगर शहर शालेय ज्युडो स्पर्धा उत्साहात पार पडली. खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. याप्रसंगी विजयी खेळाडूंसमवेत राष्ट्रीय कीर्तीचे मार्गदर्शक प्रा. संजय धोपावकर, मुख्य प्रशिक्षक आदित्य धोपावकर, तसेच शुभम दातरंगे आणि अथर्व नरसाळे आदी.

# सिद्धीबाग हॉलमध्ये शहर शालेय ज्युडो स्पर्धा उत्साहात

## खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड

नगर – अहिल्यानगर शहर शालेय ज्युडो स्पर्धा येथील सिद्धीबाग ज्युडो हॉलमध्ये उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडल्या. या स्पर्धेचे उद्घाटन उद्योगपती राहुलसिंग ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी राहुलसिंग ठाकूर यांनी सर्व सहभागी खेळाडूंना यशस्वीतेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी सिद्धीबाग ज्युडो हॉलसाठी त्यांच्या वतीने नवीन ज्युडो मॅट सेट उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

या स्पर्धेत १४, १७ आणि १९ वर्षांखालील गटांतील मुलं व मुलींच्या एकूण ४६ वजनगटांमध्ये स्पर्धा घेण्यात आली.

१४ वर्षांखालील मुलींच्या गटात, सिद्धीबाग ज्युडो हॉलच्या स्वर डहाळे हिने २७ किलो वजनगटात, अमृता झिंजे हिने ४० किलो गटात, ऋचा बोगा हिने ४४ किलो गटात तर सिद्धी दातरंगे हिने ४४ किलोवरील गटात सुवर्णपदक पटकावले.

१७ वर्षांखालील मुलींच्या गटात, अनन्या लखपती (४० किलो), अनुष्का आव्हाड (४४ किलो), गार्गी गायकवाड (४८ किलो), आरोही खवळे (५२ किलो) आणि अबोली बेरड (५७ किलो) यांनी प्रभावी कामगिरी करत सुवर्णपदके जिंकली.

१९ वर्षांखालील मुलींच्या गटात, गार्गी मुळे (५२ किलो), अक्षरा वाणे (५२ किलो), अहाना भंडारी (६३ किलो) आणि साक्षी जम्बुरे (७० किलो) यांनी आपल्या उत्कृष्ट खेळाने सुवर्णपदके मिळवली.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात, देवेश शिंदे (३० किलो), युवराज आव्हाड (४५ किलो), ओमप्रकाश दहिफळे (५० किलो) आणि ओम पोकळे (५० किलोवरील गट) यांनी सुवर्ण पदके पटकावून आपली चमक दाखवून दिली.

१७ वर्षांखालील मुलांच्या गटात, लखपती सत्यम (४० किलो), राम होळकर (५५ किलो) आणि राम दातरंगे (७३ किलो) यांनी आपल्या गटात सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

१९ वर्षांखालील मुलांच्या गटात, हिमांशु जाधव (४५ किलो), युवराज सोनवणे (५० किलो), वीर साळवे (६० किलो) आणि यश शिनगारे (६६ किलो) यांनी विजय मिळवत सुवर्णपदके जिंकली.

खेळाडूंना यश मिळवून देण्यासाठी राष्ट्रीय कीर्तीचे मार्गदर्शक प्रा. संजय धोपावकर, मुख्य प्रशिक्षक आदित्य धोपावकर, तसेच शुभम दातरंगे आणि अथर्व नरसाळे यांचे मार्गदर्शन लाभले. याशिवाय, ज्युडो संघटनेचे अध्यक्ष धनंजय जाधव यांचे सततचे प्रोत्साहनही खेळाडूंना बळ देणारे ठरले.

सिद्धीबाग ज्युडो हॉलच्या खेळाडूंनी यंदाही स्पर्धेत वर्चस्व सिद्ध करत शहराच्या आणि संस्थेच्या नावलौकिकात भर घातली आहे.

# फिरोदिया शिवाजीयन्स इंटरस्कूल फुटबॉल स्पर्धेत तक्षिला विद्यालयाचा प्रथम क्रमांक

नगर – अहिल्यानगर येथे आयोजित फिरोदिया शिवाजीयन्स इंटरस्कूल फुटबॉल स्पर्धेत २१ शाळांनी सहभाग नोंदविला. यात एकूण १०८ सामने खेळवण्यात आले. १४ वर्षे वयोगटात तक्षिला विद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकावले. विजयानंतर आयोजित पारितोषिक वितरण समारंभात अहिल्यानगर फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया आणि वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. वाळवेकर यांच्या हस्ते तक्षिला विद्यालयाच्या विजेत्या संघाला चषक प्रदान करण्यात आला. तसेच उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करणाऱ्या तन्मय लोढा, साईराज कबाडी आणि शौर्य मोरे या विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले.

प्राचार्या सौ. जयश्री मेहेत्रे यांनी शाळेच्या परिपाठात विद्यार्थ्यांसमोर विजेत्या संघाचे तसेच खेळाडूंचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, आपल्या विद्यालयाच्या संघाने मिळवलेला हा विजय म्हणजे तक्षिला विद्यालयासाठी अभिमानाचा क्षण आहे. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन केले.



फिरोदिया शिवाजीयनस इंटरस्कूल फुटबॉल स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात तक्षिला विद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकावले.

# मराठा सोयरिक संस्थेच्यावतीने नेवासामध्ये १९ ऑक्टोबर रोजी मोफत वधुवर मेळाव्याचे आयोजन

नगर – अखंड मराठा समाज व मराठा सोयरीक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मराठा सोयरिक संस्थेचा १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता नेवासाफाटा येथील G$.K. मंगल कार्यालय येथे मोफत मराठा वधुवर परिचय मेळावा नेवासा फाटा येथे आयोजित करण्यात आला आहे. तसेच या मेळाव्यासाठी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल अशी माहिती जगदंब फाऊंडेशनचे अध्यक्ष व साई सेवा हॉस्पिटलचे संचालक गणेश शिवाजी लंघे व मराठा सोयरिक संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष अशोक पांडुरंग कुटे यांनी दिली आहे. माहितीसाठी ८८४७७२४६८०.

संस्थेने आतापर्यंत १०० यशस्वी वधु वर मेळावे घेतले आहेत. हा १०१ वा मेळावा आहे. या संस्थेकडून आत्तापर्यंत ५००० पेक्षा जास्त लग्न जमून पार पडले आहेत. त्यापैकी ५६७ लग्न हे विधवा, विदुर घटस्फोटीत यांचे पार पडले आहेत. धर्मादाय कार्यालयात नाव नोंदणी केलेली अशी जगदंब फाउंडेशन अंतर्गत शासनमान्य ही संस्था आहे. मेळाव्यासाठी वधू–वरांनी फोटो बायोडाटा घेऊन पालकांसह येणं बंधनकारक आहे. पुनर्विवाह इच्छुक व्यक्ती देखील मेळाव्यात येऊ शकतात. या ठिकाणी विविध भागातील, विविध क्षेत्रातील, उच्च शिक्षित स्थळे सर्वांना बघायला मिळणार आहेत.

तसेच पुढील मेळावे नाशिक व पुणे जिल्ह्यातही होणार असल्यामुळे जास्तीत जास्त वधू वर पालकांनी मोफत मराठा वधू वर मेळाव्याचे लाभ घेण्याचे आवाहन जी. के. ग्रो प्रॉडक्टचे संचालक गोरक्षनाथ कोतकर पाटील, नानासाहेब दानवे, जयश्री कुटे, बाळासाहेब नवगिरे, डॉ.करणसिंह घुले, डी. जी. पाटील, पत्रकार गोरक्षनाथ पटारे, पत्रकार कारभारी गरड, राहुल आठरे,कल्याण शेजुळ, सोमनाथ गायकवाड, रावसाहेब घुमरे, मा.प्राचार्य पंडितराव खाटीक, प्राचार्य सचिन कर्डिले, रमेश सावंत, चंद्रकांत काळे, भैय्यासाहेब कोठुळे, शंकर फसले, उज्वला शेळके कर्जत, मोहन हेलकुटे, राजेंद्र औताडे श्रीरामपूर यांनी केले आहे.

# संस्कार भारतीतर्फे पर्यावरणपूरक किल्ले बनवा स्पर्धा

नगर – संस्कार भारती पश्चिम प्रांत, अहिल्यानगर समिती' ने कला धरोहर विधा आणि दृष्यकला विधा च्या माध्यमातून या वर्षापासून पर्यावरणपूरक किल्ले बनवा स्पर्धाचे आयोजन केले आहे, अशी माहिती समितीच्या कला धरोहर विधा संयोजक सौ. सुनीता शर्मा यांनी दिली.

संपूर्ण भारतात तसेच विशेषत: महाराष्ट्राला गड–दुर्ग यांची समृद्ध परंपरा आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पराक्रम आणि संघर्ष यांची प्रतिके म्हणजे गड, कोट, किल्ला, दुर्ग अशा विविध नामावलीत येणारी ही वास्तू म्हणजे ऐतिहासिक लढाया, आक्रमणाचे, संरक्षणाचे, रहाण्याचे, वस्तीचे, टेहळणीचे आणि महत्त्वाचे म्हणजे राज्यकारभाराचे साधन. किल्ला हे शौर्याचे, ध्येयाचे प्रतीक आहे. आपल्या इतिहासातील अनेक सुवर्ण क्षण, अनेक मोहिमा, आनंदाचे दुःखाचे क्षण, पराभव– विजय, पराक्रम, आक्रमण या बाबींचा अभ्यास करून स्पर्धेत सहभागी होणे अपेक्षित आहे.सहभागी होण्यासाठी रूपये २०० प्रवेश शुल्क असून, प्रवेश शुल्कासहीत अर्ज जमा करण्याची अंतिम मुदत १७ ऑक्टोबर आहे. अहिल्यानगर शहर तसेच लगतच्या उपनगरात वास्तव्य असलेल्या किंवा शिक्षण घेत असलेल्या १५ वर्षांखालील विद्यार्थ्यांना तसेच त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना त्यांचा स्वतंत्र संघ तयार करून स्पर्धेत सहभागी होता येईल, अशी माहिती दृष्य कला विधा संयोजक अशोक डोळसे यांनी दिली.

प्रथम क्रमांकास रुपये ७,७७७ + स्मृतीचिन्ह, द्वितीय क्रमांकास रुपये ५,५५५ + स्मृतीचिन्ह आणि तृतीय क्रमांकास रुपये ३,३३३ + स्मृतीचिन्ह असे पारितोषिकांचे स्वरुप आहे, अशी माहिती स्पर्धाप्रमुख आशुतोष तांबोळी यांनी दिली. प्रवेश अर्जात नमूद केलेल्या नियम आणि अटींचे काटेकोरपणे पालन करून या पर्यावरणपूरक किल्ले बनवा स्पर्धेत संघांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संस्कार भारती अहिल्यानगर समितीचे अध्यक्ष ॲड. दीपक शर्मा आणि सचिव सौ. स्नेहल झांबरे यांनी केले आहे.

प्रवेश अर्ज तसेच स्पर्धेच्या नियम आणि अटी संदर्भात माहितीसाठी संपर्क साधावा. मनोज बालटे ९०७५४०२२२६, सौ. तन्मयी भावे ९८६०००५२००, अशोक डोळसे ९८९०२६९६९८, नंदकुमार देशपांडे ९८६०४९५६१५, आशुतोष तांबोळी ९९२२४४८१३५

# खेळातही शाळेच्या मुली आघाडीवर : वैशाली कोतकर

## ओएसिस स्कूलच्या मुलींचा संघ जिल्हास्तरीय शालेय बास्केटबॉल स्पर्धेत विजयी



ओएसिस इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुलींच्या संघाने जिल्हास्तरीय शालेय बास्केटबॉल स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकाविले.

नगर – ओएसिस इंग्लिश मीडियम स्कूलचे विद्यार्थी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर क्रीडा क्षेत्रातही आघाडीवर आहेत. या स्पर्धेत मुलींनी दाखवलेली जिद्द, आत्मविश्वास आणि संघभावना कौतुकास्पद आहे. या विजयाने केवळ शाळेचेच नव्हे तर संपूर्ण शहराचे नाव उंचावले असल्याचे वैशाली कोतकर यांनी सांगितले.

शहरातील ओएसिस इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुलींच्या संघाने जिल्हास्तरीय शालेय बास्केटबॉल स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकाविले. १७ वर्षांखालील वयोगटातील या स्पर्धेत ओएसिस स्कूलच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत प्रतिस्पर्धी संघांना आपली ताकद दाखवून दिली. अंतिम सामन्यात समर्थ विद्यालयावर ३९ : १० गुणांनी दणदणीत विजय मिळवत ओएसिस स्कूलने विजेतेपदावर आपले नाव कोरले.

विजयी संघाला प्रशिक्षक सुभाष कनोजिया व छबुराव कोतकर यांचे मार्गदर्शन लाभले. संघाच्या या यशामध्ये शाळेच्या डायरेक्टर वैशाली कोतकर, प्राचार्या कल्पना दारकुंडे, इन्चार्ज पांडुरंग गवळी व सुभाष पवार यांचेही योगदान लाभले. विजयानंतर शाळेचे अध्यक्ष भानुदास कोतकर व डायरेक्टर वैशालीताई कोतकर यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

प्राचार्या कल्पना दारकुंडे म्हणाल्या की, मुलीं केवळ अभ्यासतच नाहीतर खेळातही पुढे आहेत. मोबाईलमध्ये गुरफटलेल्या मुला–मुलींनी स्वत:च्या सर्वांगीन विकासासाठी मैदानावर येण्याची गरज आहे. शाळेत विद्यार्थ्यांना खेळासाठी देखील प्रोत्साहन दिले जात असल्याचे त्या म्हणाल्या. स्पर्धेत विजय मिळविल्यानंतर खेळाडूंनी आनंद व्यक्त करत मार्गदर्शक शिक्षकांचे आभार मानले. पालकांनीही मुलींच्या यशाचा आनंद व्यक्त केला.

# श्री रामकृष्णाच्या विद्यार्थिनी वक्तृत्व स्पर्धेत अव्वल



वक्तृत्व स्पर्धेत अव्वल आलेल्या श्री रामकृष्णाच्या विद्यार्थिनी.

नगर – बीपी एच इ सोसायटीचे अहमदनगर कॉलेज, अहिल्यानगरने आयोजित केलेल्या रूथीबाई हिवाळे वक्तृत्व स्पर्धेच्या २५ व्या वर्षात श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थिनींनी अभ्यासपूर्ण सहभाग घेऊन बक्षिसे मिळवली. ही स्पर्धा मराठी व इंग्रजी या दोन विभागात होती. इंग्रजी विभागात मध्ये संस्थेतील इ. बारावी विज्ञान शाखेतील सई पवार या विद्यार्थिनीने पुढील पिढीसाठी आपण पृथ्वी कशी चांगली ठेवू शकतो, इ. नववी मधील चैताली चौगुले या विद्यार्थिनीने आजचे विद्यार्थी भावी नेता तसेच इ. नववी मधील दिशा गांधी या या विद्यार्थिनीने माझ्या नजरेतील २०४७ मधील भारत या विषयांवर इंग्रजी भाषेमध्ये आपले विचार प्रभावीपणे व्यक्त केले.

स्पर्धेतील मराठी विभागामध्ये इ. अकरावी विज्ञान शाखेतील भगवती उबाळे या विद्यार्थिनीने आपले आजचे व्रत भविष्यातील हिरवी पृथ्वी व इ. अकरावी विज्ञान शाखेतील रोशनी लोखंडे या विद्यार्थिनीने अभिजात मराठी संस्कृतीची शान या विषयांवर मुद्देसूतपणे विचार मांडले.

सहभागी विद्यार्थिनींपैकी मराठी विभागात इ. अकरावी विज्ञान शाखेतील रोशनी लोखंडे या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकावला असून तिला संयोजकांकडून रु. ७००१, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. तसेच इंग्रजी विभागामध्ये इ. नववी मधील चैताली चौगुले हिने तृतीय क्रमांक मिळवला असून संयोजकांकडून रुपये २५००, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन तिला गौरवण्यात आले.

स्पर्धेसाठी तयारी करताना विद्यार्थिनींना संस्थेतील मराठी विषयाच्या शिक्षिका सौ. उमा जोशी व इंग्रजी विषयाचे शिक्षक सौ. मौसमी लोंढे व श्रेयकुमार गुंडू यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी घेतलेला सहभाग व मिळालेले यश पाहून संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष व शाळा समितीचे चेअरमन नंदकुमार झंवर, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना व राजेश झंवर, सचिव डॉ. शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक यांनी विद्यार्थिनींना प्रत्यक्ष भेटून कौतुक केले. संस्थेचे सर्व पदाधिकारी मुख्याध्यापक उप मुख्याध्यापक समन्वय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सर्वांनीच सहभागी तसेच बक्षीस पात्र विद्यार्थिनींचे अभिनंदन व कौतुक केले.

# 'मेकॅनिकल अभियांत्रिकीतील उदयोन्मुख प्रवाह' विषयावर सागर ससाणे यांचे अडसुळ कॅम्पस येथे ऑनलाईन व्याख्यान



नगर – अडसुळ टेक्निकल कॅम्पसच्या मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागात ११ ऑक्टोबर रोजी विशेष ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. मेकॅनिकल अभियांत्रिकीतील उदयोन्मुख प्रवाह या विषयावर हे व्याख्यान सागर श्रीकांत ससाणे यांनी दिले. या कार्यक्रमात १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

सागर ससाणे हे सध्या श्नायडर इलेक्ट्रिक कंपनीमध्ये कार्यरत आहेत. त्यांना ABB, LT आणि Schneider Electric या कंपन्यांमध्ये २० वर्षांहून अधिकचा समृद्ध औद्योगिक अनुभव आहे. त्यांनी मेकॅनिकल अभियांत्रिकीमध्ये मास्टर डिग्री, मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंटमध्ये MBA, तसेच विविध क्षेत्रांतील एकूण १० उच्च शिक्षण पदव्या प्राप्त केल्या आहेत. त्यांनी २ पेटंट्स नोंदवले असून ३ आंतरराष्ट्रीय संशोधन पेपर्स सादर केले आहेत. तसेच १०० हून अधिक विशेष प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण केले आहेत.

या व्याख्यानात त्यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक अभियांत्रिकीतील तंत्रज्ञान, डिजिटायझेशन, ऊर्जा कार्यक्षमता, स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग, आणि नवोपक्रम याबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांनी उद्योगातील वास्तव अनुभव आणि तांत्रिक ज्ञान यांचा संगम अनुभवला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. मयूर गीते, प्रा. वाघमारे, अडसुळ टेक्निकल कॅम्पसचे प्राचार्य आणि मेकॅनिकल विभागप्रमुख यांनी विशेष प्रयत्न केले. विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले असून अशा प्रकारच्या व्याख्यानांचे आयोजन नियमितपणे व्हावे, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात आली.

# अर्थजगत

## यूएएन आठवत नसल्यास...

आजच्या काळात नोकरी करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात ईपीएफ म्हणजे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी मोठा आधार बनला आहे. हा तो पैसा असतो जो तुमच्या पगारातून दर महिन्याला थोड्या प्रमाणात वाचवून ठेवला जातो, जेणेकरून निवृत्तीच्या वेळी वृद्धापकाळात आर्थिक सोय व्हावी.



परंतु अनेकदा लोक आपला युनिव्हर्सल अकाउंट नंबर विसरतात किंवा तो त्यांच्या खात्याशी जोडलेलाच नसतो. चांगली गोष्ट म्हणजे आता ईपीएफओ म्हणजे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने अशा लोकांसाठीही सोपे उपाय उपलब्ध करून दिले आहेत.

**जाणून घ्या...**

अलीकडील अपडेट्सनुसार, तुम्ही यूएएन नसतानाही तुमचा बॅलन्स तपासू शकता ह फक्त मोबाईलवरून एक मिस्ड कॉल किंवा एसएमएस पुरेसा आहे.

यूएएन नसेल, तर काळजी करण्याचे काहीच कारण नाही. ईपीएफओने जुन्या पद्धती अजूनही सुरू ठेवल्या आहेत. त्यातील सर्वात सोपी म्हणजे मिस्ड कॉल सेवा.तुमच्या नोंदणीकृत मोबाईलवरून ९९६६०४४४२५ या क्रमांकावर कॉल करा. कॉल आपोआप कट झाल्यानंतर लगेच एक एसएमएस येईल, ज्यामध्ये तुमच्या शेवटच्या योगदानाची आणि सध्याच्या बॅलन्सची माहिती असेल. ही सेवा मोफत आहे, परंतु ती फक्त यूएएन सक्रिय सदस्यांसाठीच आहे ह जिथे आधार, पॅन किंवा बँक तपशील जोडलेले आहेत.

हा मार्गही चालला नाही, तर ईपीएफओच्या युनिफाइड मेंबर पोर्टलवर जा. तेथे 'नो यूएएन सर्व्हिस' हा पर्याय निवडा. तुमचे नाव, जन्मतारीख, ईपीएफ खाते क्रमांक आणि कंपनीची माहिती भरा. सबमिट केल्यावर तुमचा बॅलन्स दिसेल. किंवा, तुम्ही ७७३८२९९८९९ या क्रमांकावर फोन करून हेल्पलाइनशी बोलू शकता. वारंवार नोकऱ्या बदलणाऱ्यांसाठी हा उपाय फायदेशीर ठरणारा आहे.

बरेचदा यूएएन लक्षात न आल्यामुळे पूर्ण प्रक्रिया थांबते. पण तो परत मिळवणे केवळ काही मिनिटांचे काम आहे.

यासाठी ईपीएफओ पोर्टलवर जा आणि लॉगिन पेजवरून 'ॠैीं णअछ' हा पर्याय निवडा. तुमचे नाव, मोबाईल नंबर, जन्मतारीख आणि आधार किंवा पॅन क्रमांक भरा. ओटीपीद्वारे व्हेरिफिकेशन करा आणि लगेच तुमचा यूएएन स्क्रीनवर दिसेल. तरीही अडचण आली, तर जवळच्या ईपीएफओ कार्यालयात जा किंवा हेल्पडेस्कवर कॉल करा. अलीकडील अपडेट्सनुसार, यूएएन सक्रिय करण्यासाठी ईह्नकेवायसी पूर्ण करणे आवश्यक आहे. हे पूर्ण नसल्यास दावा (क्लेम) किंवा बॅलन्स तपासणे शक्य होत नाही. म्हणून आधी ही प्रक्रिया पूर्ण करा आणि मग इतर सेवा वापरा.

◆◆◆

## जागतिक संकेतांमुळे तेजीला ब्रेक लागेल?

भारतीय शेअर बाजाराने १० ऑक्टोबर २०२५ रोजी संपलेल्या आठवड्यात सलग दुसऱ्यांदा आपली चढती कमान कायम ठेवली. निफ्टीने २५,३०० चा स्तर पुन्हा एकदा पार केला आणि सेन्सेक्सने ८२,५०० च्या वर स्थिरावून गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास अधिक मजबूत केला. सकारात्मक जागतिक संकेत, देशांतर्गत आर्थिक स्थैर्य, विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांचा बदललेला कल, तसेच देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांची सततची खरेदी ह या सर्व घटकांनी मिळून बाजारातीला तेजीला ऊर्जा दिली.

६ ते १० ऑक्टोबरच्या दरम्यान सेन्सेक्स १,२९३.६५ अंक म्हणजेच १.५९ टक्क्यांनी वाढून ८२,५००.८२ या पातळीवर बंद झाला; तर राष्ट्रीय बाजाराचा निर्देशांक असणारा निफ्टी ३९१.१ अंकांनी म्हणजेच १.५७ टक्क्यांनी वाढून २५,२८५.३५ वर स्थिरावला. ही वाढ गेल्या तीन महिन्यांतील सर्वात मजबूत कामगिरी मानली जात आहे. विशेष म्हणजे आयटी आणि बँकिंग क्षेत्रातील शेअर्सनी या तेजीचं नेतृत्व केलं.

गेल्या आठवड्यात टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसच्या बाजार भांडवलामध्ये सर्वाधिक वाढ झाली. त्यानंतर इन्फोसिस, एचसीएल टेक्नॉलॉजीज आणि भारती एअरटेल यांचा क्रमांक राहिला. दुसरीकडे, टाटा मोटर्स, ट्रेंट आणि हिंदुस्तान युनिलिव्हर यांच्या मार्केट कॅपमध्ये घट झाली. टीसीएसने दुसरा अंतरिम लाभांश ₹११ प्रति शेअर जाहीर करत आयटी क्षेत्रातील तेजीला बळ दिलं. १२ आठवड्यांच्या शुद्ध विक्रीनंतर अखेर विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार पुन्हा खरेदीदार बनले. त्यांनी २९७५ कोटी रुपयांची निव्वळ खरेदी केली. देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदार मात्र सलग २५व्या आठवड्यातही शुद्ध खरेदीदार राहिले आणि त्यांनी ८,३९१ कोटी रुपयांचे शेअर्स खरेदी केले. या सातत्यपूर्ण खरेदीमुळे बाजारातील तेजीला मजबूत आधार लाभला आहे.

डॉलर इंडेक्समध्ये झालेल्या थोड्याशा घसरणीमुळे रुपयाला आधार मिळाला. बीएसईवरील लिस्टेड कंपन्यांचे एकत्रित मार्केट कॅपिटल आठवड्याभरात ३.५४ लाख कोटी रुपयांनी वाढले. ३ ऑक्टोबरला हे मूल्य ४५,८५३,४९२ कोटी रुपये होते, जे १० ऑक्टोबरला ४६,२०८,०६७ कोटींवर पोहोचले.

या पार्श्वभूमीवर चालू आठवड्याचा विचार करायचा झाल्यास वेगळे चित्र समोर येत असून ते काळजी वाढवणारे आहे. याचे कारण पुन्हा एकदा ट्रम्प महाशयच आहेत. डोनाल्ड ट्रंप यांनी चीनवर नवीन टॅरिफ वाढीचा इशारा दिल्याने शुक्रवारी वॉल स्ट्रीटमध्ये सहा महिन्यांतील सर्वात मोठी घसरण झाली. एसअँडपी ५०० मध्ये २.७ टक्के, नॅसडॅकमध्ये ३.५% घसरण दिसली. ट्रंप यांच्या कठोर वक्तव्यामुळे जागतिक गुंतवणूकदार सावध झाले आहेत. जर टॅरिफ तणाव वाढला, तर उदयोन्मुख बाजारांमधून भांडवल बाहेर पडण्याची भीती आहे. त्याचबरोबर अमेरिकन फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांच्या १४ ऑक्टोबरच्या भाषणातून व्याजदर आणि महागाईबाबत संकेत मिळतील. गिफ्ट निफ्टमध्ये १९७ अंकांची घसरण शुक्रवारी नोंदवली गेली आहे. त्यामुळे सोमवारच्या सत्राची सुरुवात भारतीय शेअर बाजारात घसरणीने होणार आहे.



- तिमाही निकालांचा यंदाचा हंगाम सकारात्मक असल्याचे दिसून आल्यामुळे आणि भारताच्या विविध देशांसोबतच्या आर्थिक–व्यापारी चर्चा सकारात्मकरित्या पुढे जात असल्याचे दिसून आल्याने विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार म्हणजेच एफआयआयकडून विक्रीचा मारा थांबवून खरेदीचे पर्व सुरू झाल्याचे दिसून आले आहे. गतसप्ताहातील तेजीचे हे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.
- गेल्या आठवड्याभरात मिडकॅप निर्देशांक २.१ टक्के आणि स्मॉलकॅप निर्देशांक १.४ टक्क्यांनी वाढले. एकूण १६ प्रमुख क्षेत्रांपैकी १२ क्षेत्रांमध्ये वाढ झाली.
- बीएसई लार्जकॅप इंडेक्स १.४ टक्के वाढला, तर मिडकॅप इंडेक्सने १.५ टक्के आणि स्मॉलकॅपने स्थिर कामगिरी केली.
- निफ्टी कॅपिटल मार्केट आणि आयटी इंडेक्सने सर्वाधिक ५ म्हणजेच टक्क्यांची वाढ नोंदवली, तर निफ्टी हेल्थकेअर इंडेक्स ३ टक्के, रिअल्टी इंडेक्स २.३ टक्के आणि प्रायव्हेट बँक, कंझ्युमर ड्युरेबल तसेच फार्मा इंडेक्स २ टक्क्यांनी वधारले. निफ्टी मीडिया इंडेक्समध्ये मात्र सुमारे ३ टक्क्यांची घसरण झाली.

**वेध बाजाराचा**

तज्ज्ञांच्या मते, बाजाराचा दीर्घकालीन ट्रेंड अद्याप तेजीचा आहे, परंतु जागतिक घटकांचा परिणाम अल्पकालीन अस्थिरता निर्माण करू शकतो. त्यामुळे विवेकी गुंतवणूक आणि क्षेत्रनिहाय निवड हेच पुढील आठवड्याचे सूत्र ठरणार आहे. ब्रिटनसोबतचा मुक्त व्यापार करार भारतासाठी अनेक संधींची दारे उघडणारा ठरला आहे. दुसरीकडे अमेरिकसोबतचे व्यापारयुद्धही संपण्याच्या मार्गावर असल्याचे संकेत मिळत आहेत. गाझा शांती कराराला भारताने दिलेला पाठिंबा गेमचेंजर ठरण्याची शक्यता आहे. तसेच चीनवरील टेरीफवाढ भारतासाठी अनुकूल ठरणारी आहे. पुढील तिमाहींमध्ये कॉर्पोरेट कमाईत वाढ होईल. तज्ज्ञांच्या मते, सध्याच्या बाजारात आयटी कंपन्यांचे व्हॅल्युएशन आकर्षक पातळीवर आहे. टीसीएस, इन्फोसिस आणि टेक महिंद्रासारख्या कंपन्यांची डिव्हिडंड यील्ड चांगली असून एआय आणि डेटा सर्व्हिसेसमधील भांडवली गुंतवणुकीवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

कंझ्युमर ड्युरेबल किंवा व्हाईट गुड्स क्षेत्रात मागणी सातत्याने वाढत आहे. वोल्टास, ब्लू स्टार, व्हर्लपूल यांचे पीई रेशो अजूनही उच्च आहेत, पण एलजी ग्रुपच्या आयपीओमुळे या क्षेत्रात गुंतवणुकीची नवी संधी निर्माण झाली आहे. ग्लोबल सप्लाय चेनचे फायदे या कंपन्यांना अधिक मिळण्याची शक्यता आहे.

रिअल इस्टेट आणि हाउसिंग फायनान्स कंपन्यांबाबत विश्लेषक म्हणतात की, सध्याच्या किंमतींच्या स्थिरतेमुळे आणि मागणीतील सातत्यामुळे हे क्षेत्र दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी योग्य आहे. चांगल्या कंपन्यांची निवड केली, तर या क्षेत्रातून गुंतवणूकदारांना समाधानकारक परतावा मिळू शकतो.

**१३ ऑक्टोबरला सप्टेंबर महिन्याचा किरकोळ महागाई दर आणि १४ ऑक्टोबरला घाऊक महागाई दर जाहीर होणार आहे. तसेच एचसीएल टेक, इन्फोसिस, विप्रो, टेक महिंद्रा, एलटीआय माईंडट्री, ॲक्सिस बँक आणि रिलायन्स इंडस्ट्रीज यांच्या दुसऱ्या तिमाहीचे निकालही येणार आहेत. या कंपन्यांच्या परफॉर्मन्सवर बाजाराची दिशा मोठ्या प्रमाणात अवलंबून राहील.**

पुढील आठवडा गुंतवणूकदारांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. कारण या कालावधीत अनेक कॉर्पोरेट घटना घडणार आहेत ह सात कंपन्यांचे स्टॉक स्प्लिट, दोन कंपन्यांचे बोनस इश्य आणि तीन कंपन्यांचे अंतरिम डिव्हिडेंड या घडामोडींमुळे बाजारात ट्रेडिंगची गती आणि लिक्विडिटी दोन्ही वाढण्याची शक्यता आहे. गोकुळ ॲग्रो रिसोर्सेस, टाटा इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन, वेलक्योर ड्रग्स, ए.बी. इन्फ्राबिल्ड, नर्मदा मॅकप्लास्ट, रोलेक्स रिंग्स आणि सुनरक्षक इंडस्ट्रीज या सात कंपन्या आपले शेअर्स विभाजित करत आहेत. शेअर्सचा फेस व्हॅल्यू कमी झाल्याने अधिक गुंतवणूकदारांना बाजारात सहभागी होता येईल.कॉनकॉर्ड कंट्रोल सिस्टिम्स आणि वेलक्योर ड्रग्स यांनी बोनस शेअर्सची घोषणा केली असून अनुक्रमे ३:५ आणि १:१० या प्रमाणात बोनस इश्यू होणार आहे. त्याचवेळी, टीसीएस, एलेकॉन इंजिनियरिंग आणि आनंद राठी वेल्थ यांनी अंतरिम लाभांश जाहीर केला आहे. निफ्टी सध्या २५,३०० च्या वर टिकून आहे. या पातळीच्या वर पुन्हा स्थिरावल्यास निफ्टी २५७०० पर्यंत झेपावू शकतो. जागतिक अस्थिरता आणि अमेरिका–चीन तणावामुळे नफा वसुली झाल्यास पुन्ह २५ हजारांपर्यंतची घसरण पहावयास मिळू शकते. अल्पकालीन गुंतवणूकदारांनी ट्रेलिंग स्टॉप लॉससह पोझिशन्स ठेवाव्यात, तर दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी आयटी, कंझ्युमर ड्युरेबल्स, फार्मा आणि बँकिंग क्षेत्र अद्याप आकर्षक दिसतात.

◆◆◆

## बँक खाते आणि वारसदार

आयुर्विमा उतरवताना, मुदतठेवी ठेवताना वा इतर अनेक ठिकाणी आपल्याला वारसदाराची नोंद करणे सक्तीचे असते. बँकेमध्येही खाते उघडताना 'नॉमिनेशन' अर्थात वारसदाराविषयीची माहिती द्यावी लागते. त्यावरून खातेधारकाचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या खात्यातील रक्कम कुणाला द्यावी हे निर्धारित केले जाते. खातेदाराने ज्या व्यक्तीचे नाव वारसदार म्हणून दिले असेल त्याच व्यक्तीला खातेदाराच्या पश्चात बँक खात्यातील रक्कम अथवा लॉकरमधील वस्तू व पैसे दिले जातात. यासाठी वारस प्रमाणपत्र, ॲमिनिस्टेशनचे पत्र अथवा न्यायालयाचा कोणताही आदेश मागितला जात नाही.

फॉर्म डीए–१ : बँकेमध्ये जर खातेधारकाने नॉमिनेशन म्हणून नाव दिलेले नसेल अथवा सध्याचे नॉमिनेशन रद्द केले असेल तर तो 'डीए–१' हा फॉर्म भरून नॉमिनेशन सादर करू शकतो. हा फॉर्म बँकेच्या वेबसाईटवरून डाऊनलोड केला जाऊ शकतो. यामध्ये खातेधारक आणि ठेवींचे विवरण आणि वारसदाराविषयीची सूचना दिली जाते. जॉइंट अकाउंट असेल तर, फॉर्मवर सर्व खातेधारकांची सही असणे आवश्यक असते.

फॉर्म डीए–२ ।ः डीए–२ या फॉर्मद्वारे सध्या असणाऱ्या वारसदाराचे नाव काढून टाकता येते. या फॉर्मवर खाते आणि खातेधारकाची माहिती भरावी लागते. तसेच ज्या वारसदाराचे नाव काढून टाकायचे आहे त्याचे नाव आणि पत्ता द्यावा लागतो. जॉइंट अकाउंट असेल तर, फॉर्मवर सर्व खातेधारकांची सही असणे आवश्यक असते.

अल्पवयीन वारसदार असल्यास

अल्पवयीन व्यक्तीचे नाव वारसदार म्हणून दिले असल्यास नॉमिनेशन फॉर्ममध्ये त्याच्या पालकांची माहिती देणे गरजेचे असते. अल्वपयीन व्यक्ती सज्ञान होईपर्यंत खातेधारकाचा मृत्यू झाल्यास त्याच्या खात्यावरील रक्कम संबंधित पालकांना काढण्याचा अधिकार असतो.



एका बँक खात्यासाठी एकच नॉमिनी असू शकतो; मात्र वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये वेगवेगळे नॉमिनी देता येतात. यासाठी वेगवेगळे नॉमिनेशन फॉर्म भरण्याची गरज असते.

'अंगठा' असल्यास साक्षीदारांची गरज

कायदेशीर वारसदाराच्या फायद्यासाठी मृत खातेधारकाचा नॉमिनी रक्कम आपल्याकडे ठेवू शकतो. खातेधारकाची सही साक्षीदारांकडून तपासण्याची गरज नसते; मात्र अंगठ्याची निशाणी असेल, तर दोन साक्षिदारांची गरज असते. ◆◆◆

## क्रेडिट कार्ड बंद करताना...

अनेकदा लोकांना त्यांचे क्रेडिट कार्ड बंद करायचे असते. काही क्रेडिट्सवर विविध प्रकारचे शुल्क आकारले जाते, ज्यामुळे अनेकांना त्याचा त्रास होतो. अशा स्थितीत त्यांना क्रेडिट कार्ड बंद करणे योग्य वाटते.

क्रेडिट कार्ड बंद करणे फार कठीण काम नाही, ते सहजपणे बंद केले जाऊ शकते. कार्ड बंद केल्यामुळे तुमच्या अनावश्यक खर्चाला आळा बसेल आणि तुम्ही तुमच्या खात्यात काही अतिरिक्त पैसे वाचवू शकाल.



क्रेडिट कार्ड बंद करण्यासाठी या ५ सोप्या स्टेप्स फॉलो कराव्या लागतील.

- **प्रथम तुमची थकबाकी अदा करा** : कोणतेही क्रेडिट कार्ड बंद करण्यापूर्वी तुम्हाला त्याची संपूर्ण देय रक्कम भरावी लागेल. तुमची थकबाकी किरकोळ असली तरीही तुम्ही तिची परतफेड करेपर्यंत तुमचे क्रेडिट कार्ड बंद केले जाणार नाही.
- **तुमचे रिवॉर्ड पॉइंट रिडीम करा** : क्रेडिट कार्ड बंद करण्याच्या घाईत बरेच लोक त्यांचे रिवॉर्ड पॉइंट रिडीम करायला विसरतात. तुम्ही ते क्रेडिट कार्ड वापरून खर्च केलेल्या सर्व पैशांसाठी रिवॉर्ड पॉइंट मिळवले आहेत. अशा परिस्थितीत, कार्ड बंद करताना, रिवॉर्ड पॉइंट्स रिडीम करण्यापूर्वी अजिबात संकोच करू नका.
- **सूचना तपासा** : बऱ्याच वेळा कार्डधारक त्यांच्या क्रेडिट कार्डवर काही आवर्ती पेमेंटसाठी स्थायी सूचना ठेवतात, जसे की विमा प्रीमियम, ओटीटी मासिक शुल्क किंवा इतर काही. कार्ड बंद करण्यापूर्वी, त्यावर अशी कोणतीही सूचना नाहीत याची खात्री करा, अन्यथा कार्ड बंद झाल्यानंतर तुमचे पेमेंट थांबू शकते. प्रीमियम थांबल्यास, तुमची पॉलिसी धोक्यात येऊ शकते.
- **बँकेला कॉल करा** : पुढील पायरी म्हणजे तुम्हाला तुमच्या क्रेडिट कार्ड बँकेला कॉल करावा लागेल. कार्ड बंद करायचे आहे हे त्यांना सांगावे लागेल. बँकेकडून क्रेडिट कार्ड बंद करण्याचे कारण विचारले जाऊ शकते. कार्डधारकाला त्याचे उत्तर द्यावे लागेल. यानंतर, आवश्यक माहिती घेतल्यानंतर, क्रेडिट कार्ड बंद करण्याची विनंती केली जाईल. बँक तुम्हाला ईमेल पाठवण्यास सांगेल किंवा कार्ड कापून त्याचा फोटो ईमेल करण्यास सांगू शकते.
- **कार्ड कापायला विसरू नका**: तुमचे क्रेडिट कार्ड बंद करण्यासाठी, सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे ते तिरपे कापून टाकणे. अन्यथा, ती चुकीच्या हातात पडल्यास, त्यातून तुमची काही माहिती चोरीला जाण्याची शक्यता आहे किंवा तुमच्या नावाने काही फसवणूक होण्याची शक्यता आहे. कार्ड फक्त डस्टबिनमध्ये टाकू नका, आधी कापून टाका आणि नंतर फेकून द्या.

◆◆◆

## विम्याची रक्कम क्लेमपेक्षा कमी का येते?

***भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाचे सदस्य सत्यजित त्रिपाठी यांनी स्पष्टपणे सांगितले की सामान्य विमा आणि आरोग्य विम्यामधील तक्रारी प्रामुख्याने दाव्यांच्या आधारे पेमेंट करण्यासाठी असतात . ते म्हणाले की अनेक प्रकरणांमध्ये दिलेली रक्कम दाव्यापेक्षा खूपच कमी असते किंवा दावे फेटाळले जातात.***



**कारणे काय?**

मा पॉलिसीमध्ये अनेक गोष्टी कव्हरमधून वगळल्या जातात आणि अनेक अटी–शर्ती घातल्या जातात. पॉलिसीधारकाने खरेदीच्या वेळी या गोष्टी लक्षात घेतल्या नाहीत तर त्याचा परिणाम कमी पेआउट आणि क्लेम सेटलमेंटच्या वेळी होऊ शकतो. ग्राहक अनेकदा अटी व शर्ती न वाचता स्वाक्षरी करतात. यामुळे कव्हरेजविषयीचे त्यांचे ज्ञान बरेचदा अपूर्ण असते.

काही पॉलिसी रुग्णालयात दाखल करताना खोलीचे भाडे, शस्त्रक्रिया आणि उपचारांवर होणाऱ्या खर्चासाठी मर्यादा घालतात. उदाहरणार्थ, जुन्या पॉलिसींमध्ये रुग्णालयातील खोलीच्या भाड्यासाठी एक निश्चित रक्कम किंवा विम्याच्या रकमेच्या १ टक्के कव्हरेज दिले जाते.जर पॉलिसीधारक विहित मर्यादेपेक्षा जास्त किंमतीची खोली निवडत असेल तर, विमाकर्ता दाव्याची रक्कम कापून घेऊ शकतो. जास्त भाडे असणाऱ्या खोलीत राहिल्यास संपूर्ण बिलावर प्रमाणानुसार कमी पैसे मिळू शकतात.

बऱ्याच पॉलिसींमध्ये विशेषत: ज्येष्ठ नागरिकांसाठी, को–पेमेंटची तरतूद देखील रामाविष्ट आहे. को–पेमेंट २० टक्के असल्यास, विमा कंपनी फक्त ८० टक्के बिल भरते आणि उर्वरित २० टक्के बिल विमाधारकाला स्वतःच्या खिशातून भरावे लागते. त्याचप्रमाणे, १ लाख रुपयांची वजावट असलेल्या पॉलिसींच्या बाबतीत, विमाधारकाला या रकमेपर्यंतचे बिल भरावे लागते. विमाकर्ता फक्त त्या मर्यादेपेक्षा जास्त बिले कव्हर करतो.

कॉस्मेटिक सर्जरीसारखे काही उपचार बरेचदा विमा पॉलिसींमध्ये समाविष्ट नसतात. अशा वेळी विमा संरक्षणाच्या बाहेरच्या या गोष्टींसाठी केलेले दावे फेटाळले जातात.

उपचारादरम्यान वापरलेले पीपीई (वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे) किट, हातमोजे आणि मुखवटे यांसारख्या वस्तूंचा सहसा विमा संरक्षणामध्ये समावेश केला जात नाही. पण एकूण बिलामध्ये उपभोगाच्या वस्तूंचा वाटा ७ ते १० टक्के असू शकतो. अनेक आरोग्य विमा पॉलिसींमध्ये ग्राहकोपयोगी वस्तूंचा समावेश होत नाही.

विमाकर्ते काही खर्चांना अनावश्यक किंवा अपारंपरिक खर्च म्हणून वर्गीकृत करू शकतात आणि ते कव्हर करण्यास नकार देऊ शकतात. अतिरिक्त अन्न किंवा कॉस्मेटिक वस्तूंसारखे गैर–वैद्यकीय खर्च कव्हरच्या कक्षेबाहेर ठेवले जातात. विमाकर्ते असा खर्च कव्हर करत नाहीत.

**विमा झोन**

हे लक्षात घेता आरोग्य विमा पॉलिसी खरेदी करताना, दस्तऐवज काळजीपूर्वक वाचणे आणि समजून घेणे आवश्यक आहे. पॉलिसीमध्ये काय समाविष्ट आहे आणि काय वगळले आहे ते नीट समजून घ्यायला हवे.

यावर दुसरा उपाय म्हणजे सर्वसमावेशक आरोग्य कव्हरेज असलेली पॉलिसी खरेदी करावी. यासाठी अनेक विमा कंपन्या आता उपभोग्य वस्तूंसाठी पर्याय देतात. तसेच विमा कंपनीच्या नेटवर्क हॉस्पिटलमध्ये उपचार घेणे देखील शहाणपणाचे आहे. यामुळे वजावट कमी होते.

तसेच आपल्यावर काही अन्याय झाला आहे किंवा विमाकर्त्यांकडून फसवणूक झाली आहे असे वाटल्यास विमा लोकपालकडे तक्रार करू शकता किंवा दुसऱ्या विमा कंपनीकडे जाऊ शकता.

◆◆◆

## फसगत झाल्यानंतर कोणाकडे करावी तक्रार?

ऑनलाइन पेमेंट आणि इ कॉमर्स संकेतस्थळावर शॉपिंग करणे ही सामान्य बाब झाली आहे. मात्र यादरम्यान आर्थिक फसवणूक, बँकिंग गैरप्रकार आणि क्रेडिट कार्ड फ्रॉड होण्याचे प्रमाण वाढत आहेत. या फसगतीची तक्रार करण्यासाठी सरकारने नॅशनल सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टल तयार केले आहे. दुर्दैवाने आपण सायबर गुन्ह्याला बळी पडलो तर यावर तक्रार नोंदवू शकतो.

**तक्रारीसाठी विवरण गरजेचे**

तक्रारीची नोंद करण्यासाठी इंटरनेट कनेक्शन असणारा फोन किंवा लॅपटॉप असणे आवश्यक आहे. आर्थिक फसवणुकीचा पुरावा असणे आवश्यक आहे. तुमच्याकडे ओळखपत्र असण्याबरोबरच घटनेची तारीख आणि वेळ याबाबत दोनशे शब्दांत विवरण द्यावे लागेल. ओळखपत्रासाठी मतदान ओळखपत्र, वाहन परवाना, पासपोर्ट, पॅन कार्ड, आधार कार्ड आदींचा वापर करता येऊ शकतो.

**फसवणुकीचा प्रकार सांगावा लागेल**

आर्थिक फसवणुक झाल्यानंतर तुम्हाला बँक/वॅलेट/ मर्चंटसंबंधीची माहिती पोलिसांना द्यावी लागेल. आयडी/युटीआर नंबर आणि १२ अंकी ट्रान्झेक्शन नंबर द्यावा लागेल. व्यवहार कोणत्या दिवशी आणि किती वाजता झाला, हे देखील सांगावे लागेल. रक्कमेचा तपशील द्यावा लागेल. ज्या संकेतस्थळावरून रक्कम काढली गेली, त्याचा युआरएल असेल तर त्याची माहिती देऊ शकता. फसवणाऱ्याचे विवरण, मोबाईल नंबर, मेल आयडी आणि बँक खात्याचा नंबर असेल तर तो नमूद करावा.




**सायबर क्राईम पोर्टलवर तक्रार करा**

पुरेशी माहिती हाताशी असल्यानंतर तुम्हाला https://cybercrime.gov.in/ वर जावे लागेल. त्यात रजिस्टर अ कंप्लेटवर क्लिक करावे लागेल. त्यानंतर तेथे फायनान्शियल फ्रॉडचा पर्याय दिसेल. पुढच्या पानावर 'फायनान्शियल फ्रॉड'चा टॅब दिसेल. तेथे रजिस्टर अ कंम्प्लेक्ट बटणावर क्लिक करावे लागेल. तेथे आय असेप्ट बटणवर क्लिक करावे लागेल. नंतर ओटीपीला क्लिक करावे लागेल. फोनमध्ये ओटीपी येईल आणि त्यानंतर कॅप्चा टाकल्यानंतर सबमिटवर क्लिक करावे लागेल.

**विमा झोन**

**ॲकनॉलेजमेंट नंबर सुरक्षित ठेवा**

फोन नंबर, लॉग इन आयडी आणि ओटीपीच्या माध्यमातून पोर्टलवर लॉग इन करता येऊ शकते. त्यानंतर तुम्हाला अर्ज भरण्याचे सांगितले जाईल. यात चार सेक्शनमध्ये माहिती नमूद करावी लागेल. ते भरल्यानंतर अर्ज सबमीट करू शकता. त्यानंतर तक्रार नोंदली जाईल. तक्रारीची पीडीएफ डाउनलोड करता येईल. ◆◆◆

# नागरी प्रश्नांसह, हिंदू धर्म रक्षणासाठी मुख्यमंत्र्यांसह आमदार सक्षम नाहीत




नगर – अहिल्यानगर मधील रस्त्यांची अवस्था, ऐन दिवाळीत खंडित होणारा वीज पुरवठा, ग्रामीण भागातून शहराकडे येणाऱ्या नगर – मनमाड, नगर – छत्रपती संभाजी नगर महामार्गांची दूरावस्था हे प्रश्न सोडवण्यासाठी आमदारांसह मुख्यमंत्री सक्षम नाहीत. शहरासह, जिल्हा, राज्यातील हिंदू असुरक्षित आहेत. प्रशासन हे हाजी प्रशासन आहे, असं वारंवार सांगणाऱ्या स्वयंघोषित हिंदू धर्मरक्षक शहर लोकप्रतिनिधींनी यामुळे 'हिंदू खतरे मे' असल्याचे कबूल केले आहे. मुख्यमंत्री आणि घटनाबाह्य असणारे दोन उपमुख्यमंत्री हे हिंदू आहेत. देशात मोदींच तथाकथीत हिंदुत्वाच सरकार आहे. अस असताना देखील हिंदू खतरे मे असल्याचे शहर लोकप्रतिनिधी वारंवार सांगतात. त्यामुळे स्वयंघोषित हिंदू धर्मरक्षकांनी आपण खरे हिंदू असाल तर आपल्या आमदारकीचा राजीनामा देऊन मुख्यमंत्र्यांच्याही राजीनाम्याची मागणी करावी, अशी मागणी ठाकरे शिवसेना शहर प्रमुख किरण काळे यांनी केली आहे.

शहर लोकप्रतिनिधींनी रविवारी बोलताना, आपल्यातले चार – दोन आत बसले तर काही फरक नाही पडत असं वक्तव्य केलं होतं. त्याला. काळे म्हणाले, शहरातील हिंदू युवकांची वैयक्तिक राजकीय स्वार्थासाठी दिशाभूल सुरू आहे. त्यांच्या हातात लाठ्या, काठ्या दिल्या जात आहेत. उच्च दर्जाचे शिक्षण, रोजगार देण्याऐवजी तरुणांना तुरुंगात जाण्यासाठी भडकाऊ वक्तव्य करून चिथावणी दिली जात आहे. आपल्यातले चार – दोन आत बसले तर काही फरक नाही पडत, असं म्हणणाऱ्यांच्या घरातला एक तरी कधी हिंदुत्वासाठी आत गेलाय का ?, असा सवाल काळे यांनी केला आहे. चिथावणी देण्यापेक्षा एमआयडीसीत कंपन्या आणा, रखडलेले पुणे विद्यापीठ उपकेंद्राच काम, शासकीय मेडिकल कॉलेज, नगर – पुणे इंटरसिटी रेल्वे, नगर एमआयडीसी विस्तारीकरणाचे काम आधी पूर्ण करा, असा सल्ला काळे यांनी दिला आहे.

काळे पुढे म्हणाले, शहर लोकप्रतिनिधींच्या म्हणण्याप्रमाणे जर खरंच हिंदू धर्म खतरे मे आहे, तर त्यांनी पूर्णवेळ धर्म रक्षणाचे कार्य करावे. धर्म रक्षणासाठी त्याग हे महत्त्वाचे मूल्य आहे. त्या त्यागाचे त्यांनी प्रतीक बनावे. धर्म कार्यासाठी भारत यात्रे करिता त्यांनी मार्गस्थ व्हावे. त्यासाठी भगवा पोशाख परिधान करावा. त्यांना भगवे वस्त्र, हिंदू धर्मग्रंथ भगवद्गीता ठाकरे शिवसेना पाठवण्याची सोय करेल. स्वयंघोषितांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न नाही. कारण त्यांचे धंदे हे पहाटेपर्यंत चालू असतात. हिंदू खतरे मे असला तरी तुमचे धंदे तेवढे मात्र सुरक्षित आहेत. त्यामुळे आता तमाम हिंदूंना सुरक्षित करण्यासाठी आपण हिंदू विरोधी असणाऱ्या सरकारला खरा विरोध करण्या करिता रस्त्यावर उतरावे, असे जाहीर आवाहन काळे यांनी केले आहे.

## सगळ्या प्रकरणांचा मास्टरमाईड एकच

कोठला परिसरात रस्त्यावर गोमांस टाकणारा, रास्ता रोको वेळी पोलिसांवर दगडफेक, रांगोळी प्रकरणातून धार्मिक भावना दुखावणारा, घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल आक्षेपार्ह लिखाण प्रकरण, या सगळ्या प्रकरणां मधील समाजकंटकांवर पोलीस प्रशासनाने कारवाई केली आहे. परंतु या सगळ्या घटना घडवणार पडद्या मागचा खरा मास्टरमाईंड हा एकच आहे. तो राजकीय आहे. तो अद्याप पोलिसांनी समोर आणलेला नाही. त्या खऱ्या समाजकंटक सूत्रधाराचा बुरखा पोलीस प्रशासनाने फाडावा, अशी जाहीर मागणी ठाकरे शिवसेनेच्या वतीने काळे यांनी केली आहे.

# हिंदूंवर हल्ले व अन्यायकारक घटना घडतील, तेव्हा त्यांना जशास तसे प्रत्युत्तर दिले जाईल

## आ. संग्राम जगताप




हिंदुत्ववादी संघटना व आंबेडकरी समजाच्या वतीने हिंदू जन आक्रोश मोर्चेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये आमदार संग्राम जगताप, आमदार गोपीचंद पडळकर, श्रीरामपूरचे सागर बेग, भीमशक्तीचे नेते वाल्मीक निकाळजे आदीसह नागरिक सहभागी झाले होते.

नगर – शहरात अलीकडच्या काळात हिंदूंना लक्ष्य करत आव्हान देणाऱ्या घटना सातत्याने घडत आहेत. मात्र, आता या घटना सहन केल्या जाणार नाहीत, असा इशारा आमदार संग्राम जगताप यांनी दिला. आता जेव्हा हिंदूंवर हल्ले व अन्यायकारक घटना घडतील, तेव्हा आधी त्यांना जशास तसे प्रत्युत्तर दिले जाईल आणि त्यानंतरच मोर्चे काढले जातील. आपले ४–५ जण आत गेले तरी चालतील, असे त्यांनी सांगितले. यावेळी आ. जगताप यांनी डेमोग्राफिकल जिहाद या विषयावर भाष्य करत पश्चिम बंगाल आणि मालेगाव येथे झालेल्या निवडणुकांचा उदाहरणांसह उल्लेख केला. भारताच्या संविधानाचा मान राखत असल्याचे सांगणाऱ्या एमआयएमच्या हैदराबाद व संभाजीनगरच्या बोकड्यांनी बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान करणाऱ्या फरीद खानचा निषेध का केला नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. जिहादी वृत्तीच्या व्यक्तींची विचारसरणी संविधानानुसार नाही. जे राष्ट्रगीत म्हणत नाहीत अशांना निवडणुकीतून बाजूला सारून त्यांना निवडून देऊ नका, अशा राष्ट्रद्रोही वृत्तीला वेळेस ठेचले ठेचले पाहिजे, असेही आ.जगताप यांनी आवाहन केले.

अहिल्यानगर शहरात मागच्या आठवड्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान करणारे पत्रके भिरकवल्याच्या निषेधार्थ आमदार संग्राम जगताप व भाजापाचे आ.गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वाखाली हिंदूशक्ती व भीमशक्तीचा हिंदू जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी दुपारी जुन्या बसस्थानक जवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करून निघालेल्या या मोर्चात आमदार जगताप, आमदार पडळकर यांच्यासह श्रीरामपूरचे सागर बेग, भीमशक्तीचे वाल्मीक निकाळजे आदींसह भाजप, हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी व आंबेडकरी समाजाचे नागरिक सहभागी झाले होते. मोर्चाच्या मार्गात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, सेनापती बापट, तात्या टोपे, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून दिल्ली गेट येथे आल्यावर मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. यावेळी मोर्चात सहभागी नागरिकांनी भगव्या व निळ्या रंगाच्या टोप्या घालून हातात झेंडे घेतले होते. हिंदुत्वाच्या घोषणा दिल्या जात होत्या.

आ.संग्राम जगताप यांनी येणाऱ्या काळात हिंदूंनी संघटित राहून जागृत राहण्याचे आवाहन करून हिंदूंकडूनच वस्तूंची खरेदी करण्यात गैर काहीच नाही, असे सांगून याची सुरुवात आधी त्यांनी ईदला पत्रके वाटून केली होती. आपला धर्म, संविधान व ग्रंथ जर सुरक्षित ठेवायचे असतील तर हिंदूंनी संघटित व जागृत होणे आवश्यक आहे, असेही आवाहन त्यांनी केले.

आमदार गोपीचंद पडळकर म्हणाले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या जिहादी वृत्तीला आधीच ओळखले होते. त्यामुळे त्यांना पूर्णपणे पाकिस्तानमध्ये पाठवा अशी मागणी डॉ. आंबेडकरांनी फाळणीच्या वेळेस केली होती. त्यावेळी बाबासाहेबांचे ऐकले असते तर आपल्यावर मोर्चा काढण्याची वेळ आलीच नसती. एमआयएमचे नेते नगरमध्ये येऊन अहिल्यानगरच्या ऐवजी आम्ही अहमदनगरच म्हणू असे जाहीरपणे सांगतात. आता कायद्याने अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर नामांतरण झालेले आहे. त्यामुळे जे कायदा मानत नाहीत अशांचे वाहन परवाना, दुकान परवाना रद्द करून त्यांना वाठणीस आणावे. भारताबद्दल ज्यांना प्रेम नाही त्यांना भारतात राहण्याचा हक्क नाही. ज्यावेळेस भारत मॅच हरतो तेव्हा ते फटाके उडवतात हे आम्ही कधीही सहन करणार नाही. पुढील काळात हिंदू धर्माबद्दल व महापुरुषांचा अपमान आम्ही कधी सहन करणार नाही. जे हात महापुरुषांची विटंबना करतील त्यांचे हात तोडण्याचे काम आम्ही करू, असा इशारा त्यांनी दिला. अहिल्यानगर शहरातील मुकुंदनगर व कोठला झोपडपट्टी या परिसराची जमीन केंद्र सरकारच्या मालकीची आहे. त्यामुळे प्रशासनाने या परिसरातून बुलडोजर फिरवावा, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

यावेळी सागर बेग व वाल्मीक निकाळजे यांनीही मार्गदर्शन करत आ.संग्राम जगताप यांच्या भूमिकेचे समर्थन केले. यावेळी भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, सुरेश बनसोडे, नानासाहेब वाघमारे, शरद म्हसे, विराज औधुते उपस्थित होते.

# अहिल्यानगरच्या तरूणाईच्या हातात बेड्या नको तर रोजगार हवा

## संविधानानुसार लोकशाही प्रक्रियेने निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधींकडून ही भाषा अजिबात अपेक्षित नाही : अभिषेक कळमकर यांची प्रतिक्रिया



नगर – मागील काही दिवसांपासून अहिल्यानगर शहरात वादग्रस्त वक्तव्य करून सामाजिक सलोखा बिघडवण्याचे काम करणाऱ्या सत्ताधारी लोक प्रतिनिधींनी रविवारी झालेल्या जन आक्रोश मोर्चात तरुणांना चिथावणी देत आपला देश, धर्म सुरक्षित ठेवण्यासाठी आपल्यातील दोन चार जण आत जण आत गेले तरी हरकत नाही असे वक्तव्य केले आहे. भारतीय संविधानानुसार लोकशाही प्रक्रियेने निवडुण येणाऱ्या लोकप्रतिनिधींकडून ही भाषा अजिबात अपेक्षित नाही. आजच्या काळात नगरच्या तरूणाईच्या हातात बेड्या नाही तर चांगल्या रोजगाराची गरज आहे. दुर्दैवाने विद्यमान लोकप्रतिनिधींना आपल्या संवैधानिक जबाबदारीचे भान राहीले नाही हे दुर्दैव आहे, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष तथा माजी महापौर अभिषेक कळमकर यांनी दिली आहे.

कळमकर यांनी म्हटले आहे की, गेली अनेक वर्षे स्वतःला कथित विकास पुरुष म्हणून घेणाऱ्या लोकप्रतिनिधींनी विधानसभा निवडणुकीनंतर भूमिका बदलली आहे. आता ते शहर विकासावर, रोजगारावर शब्द बोलायला तयार नाहीत. ऊलट ते जाहीर व्यासपीठावर तरूणाईला आत जाण्याची तयारी ठेवा असे आवाहन करत आहे. हे विरोधाभासी आहे. कोणत्याही सूज्ञ नागरिकाला ही भूमिका पचणारी नाही. आज नगरमधील हजारो युवक चांगल्या रोजगाराठी पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगरला जात आहेत. याला कारण नगर शहरात रोजगाराच्या संधी नाहीत. ही वस्तुस्थिती असतात राहिलेल्या तरूणाईला कायदा हातात घेऊन तुरूंगात जाण्याचे आवाहन केले जात असेल तर कोणते पालक आपल्या मुलांना घराबाहेर सोडेल? याचा विचार आणि आत्मपरीक्षण लोकप्रतिनिधींनी केले पाहिजे. देश, महाराष्ट्र सुरक्षित ठेवण्यासाठी संरक्षण दल, पोलिस दल सक्षम आहे. तरूणाईने आपली ऊर्जा देशाच्या विकासासाठी खर्च केली पाहिजे. नगरकांनी संविधानिक जबाबदारी तुमच्यावर सोपवली आहे. तुम्ही एकीकडे संविधानाची भाषा बोलता आणि दुसरीकडे तरुणाईला कायदा हातात घेण्याच्या सूचना करता, अशी टीका कळमकर यांनी केली आहे.

# दुकानासमोरुन स्कूटीच्या डिक्कीतून ३ लाखांची रोकडची चोरी

जामखेड – शहरातील शिंगवी चष्माघर दुकानासमोरून ३ लाख रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना ११ ऑक्टोबर रोजी दुपारी घडली. या प्रकरणी व्यावसायिक अभय अशोक शिंगवी (वय ४७, रा. जामखेड) यांनी पोलिसात फिर्याद दाखल आहे. फिर्यादीनुसार, शिंगवी यांनी १० ऑक्टोबर रोजी दुपारी १.१५ वाजता स्टेट बँक, जामखेड येथे चेक द्वारे ३ लाख ५० हजार रुपये काढले. त्यानंतर त्यांनी ३ लाख रुपये आपल्या स्कूटी (क्र.एमएच१६ सीटी ६२७८) च्या डिक्कीत ठेवले आणि ५० हजार रुपये खिशात ठेवले. शिंगवी चष्माघर दुकानासमोर स्कूटी लावून दुकानात प्रवेश केला. काही वेळानंतर नगर मर्चंट बँकेत पैसे जमा करण्यासाठी गेल्यावर त्यांनी स्कूटीची डिक्की उघडली असता ३ लाख रुपयांची रक्कम गायब असल्याचे लक्षात आले. त्यांनी तत्काळ आजूबाजूला शोध घेतला, मात्र पैसे मिळून आले नाहीत. त्यानंतर शिंगवी यांनी पोलिस ठाण्यात धाव घेत अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी घटनास्थळी भेट देत तपास सुरू केला असून, आजूबाजूच्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडून विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालू नाही अथवा प्रलंबित नाही व सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे, पतसंस्थेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही, असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता.१३/१०/२०२५.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** : जिल्हा अहिल्यानगर पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर हद्दीतील **मौजे केडगांव येथील** खालील वर्णनाची प्लॉट मिळकत – **सर्व्हे नं. १४५/३ मधील प्लॉट नं.१९ (संगणकीकृत ७/१२ उताऱ्याप्रमाणे सर्व्हे नं.१४५/३/प्लॉट १९) चे एकुण क्षेत्रफळ २५५.६० चौ.मी. यापैकी उत्तर बाजुचा १२७.८० चौ.मी. हा संपुर्ण प्लॉट. यांसी चतुःसिमा :–**

पुर्वस :– अंतर्गत रस्ता
दक्षिणेस :– प्लॉट नं.१९ पैकी राहिलेला १/२ भाग
पश्चिमेस :– खुली जागा उत्तरेस – प्लॉट नं. १८

**वर नमूद मिळकतीचे**
**विद्यमान मालक – संदिप बाजीराव तरटे,**
रा. मु.पो. पळवे खुर्द,
ता.पारनेर,
जि.अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग,
चितळे रोड, अहमदनगर. मो. नं. 9011678999. 9860805559



## जाहीर नोटिसीस हरकत

तमाम लोकांस व विशेष करुन **ॲड. एस.एन.गुगळे, पत्ता : चितळे रोड, अहिल्यानगर व त्यांचे अशिल** यांस प्रस्तुत जाहिर नोटीसीस हरकतीद्वारे कळविण्यात येते की, जिल्हा अहमदनगर पोटतुकडी व तालुका नगर पैकी जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे चास, ता.जि. अहिल्यानगर येथील गट नं.१२६/२ चे एकुण क्षेत्र १ हे.६० आर व गट नं.१५०/१ चे एकूण क्षेत्र २ हे.३७.१५ आर पैकी २ हे.०० आर या १) नरेंद्र संपतलाल बाफना, २. सिदांत सतिष चोपडा, ३. सुभाष गंगाधर झिने व ४. संपतलाल कचरदास बाफना** यांच्या मालकीच्या मिळकतीबाबत तारीख २४/०९/२०२५ रोजी दैनिक नवा मराठा या वर्तमानपत्रामध्ये ॲड. एस.एन.गुगळे यांच्या मार्फत जाहीर नोटीस प्रसिध्दीस दिलेली असून त्यास आमचे अशिल नामे सौ. नर्मदा नाना कार्ले, वत्सला गंगाधर कार्ले, लता पोपट कार्ले व बबई मुरलीधर कोतकर सर्व रा. चास, ता.जि.अहिल्यानगर. यांची हरकत आहे. सदर हरकतीचे कारण असे की सदर गट नं.१५०/१ मध्ये आमच्या अशिलाने सर्व्हिस रोड ते कॉर्नरपर्यंत ४७.०० मीटर व कॉर्नरपासुन पुढे सदर मिळकत मालकांना खरेदी दिलेल्या मिळकतीपर्यंत ७२.०० मीटर लांबीचा व ९.०० मीटर रुंदीचा रस्ता याचे क्षेत्र ० हे. ११ आर हा रस्ता फक्त गट नं.१५०/१ मधील सहधारकांना फक्त व्यक्तीगत वहिवाटीसाठी व जाणे–येण्यासाठी वापर करण्याचा अधिकार आहे व तसा उल्लेख सदर मिळकतीच्या खरेदीखतामध्ये स्पष्टपणे नमूद केलेला आहे. त्यामुळे सदर रस्त्याचा वापर इतर लगतचे गट धारकांना म्हणजेच गट नं.१२६/२ व इतर गट धारकांना मुळीच नाही. तसेच सदर रस्त्याचा वापर करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे व तो सर्व लगत गट धारक गट नं.१२६/२ सह सामाईक वापराचा आहे असे भासवून सदर मिळकत विक्रीचा प्रयत्न केलेला आहे व त्याचा कुठलाही उल्लेख व मिळकतीच्या योग्य चतु:सिमा नमुद न करता केवळ मोघम स्वरुपाची जाहीर नोटीस प्रसिध्द करुन योग्य व खऱ्या वस्तुस्थितीचा उल्लेख न करता खोटी नोटीस प्रसिध्द केली आहे व त्याचप्रमाणे सदर मिळकत मालकांचा गट नं. १५०/१ मध्ये २ हे.०० आर क्षेत्र नसून केवळ १ हे.८० आर क्षेत्र आहे व सदर जाहीर नोटीसीमध्ये त्यांचे २ हे. ०० आर क्षेत्र कसे झाले आहे याचा देखील कुठल्याही प्रकारचा कायदेशीर खुलासा करण्यात आलेला नाही. त्यामुळे अशाप्रकारच्या मोघम व वस्तुस्थितीचा कुठल्याही प्रकारचा उल्लेख न केलेल्या खोट्या जाहीर नोटीसीच्या आधारे कुठल्याही प्रकारचा मिळकत खरेदी–विक्रीचा व्यवहार झाल्यास संबंधित खरेदीदारांना मिळकतीची कायदेशीर मालकी व टायटल प्राप्त होणार नाही व विनाकारण गुंतागुंत व वाद निर्माण होईल याची नोंद **ॲड, एस.एन. गुगळे, पत्ता. चितळे रोड, अहिल्यानगर व त्यांचे अशिलांनी घ्यावी व यदाकदाचित सदर खोट्या बोगस जाहीर नोटीसीच्या आधारे व्यवहार केल्यास अथवा खरेदीखत नोंदविल्यास संबंधितांविरुध्द योग्य ती न्यायालयीन कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.** विनाकारण कोणाचीही फसवणूक होऊ नये या हेतूने प्रस्तुत जाहीर नोटीसीस हरकत प्रसिध्द केली असे.

येणे प्रमाणे जाहिर नोटीसीस
हरकत प्रसिध्द केली आहे.
ता. १३/१०/२०२५.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग,
चितळे रोड, अहमदनगर. मो. नं. 9011678999. 9860805559


# बसस्थानकात झालेल्या दागिने चोरीचा तपास लावा

## चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची पोलीस निरीक्षकांकडे आ. संग्राम जगताप यांची निवेदनाद्वारे मागणी



तारकपूर बस स्थानकात झालेल्या दागिने चोरीचा तपास लावावा या मागणीचे निवेदन तोफखान्याचे पो.नि. आनंद कोकरे यांना देताना आ.संग्राम जगताप व शिष्टमंडळ. (छाया – लहू दळवी)

नगर – बोल्हेगाव येथील रहिवासी सुहासिनी अडोळे या सोलापूर येथून एसटी बसने प्रवास करीत माळीवाडा बसस्थानकापर्यंत आल्या असता सोन्याचे दागिने ठेवलेली पिशवी त्यांच्यासोबत होती मात्र बस माळीवाडा बसस्थानकातून तारकपूर येथे आल्यावर एक अनोळखी महिलेने जागा मिळवण्याच्या बहाण्याने त्या सोन्याचे दागिने ठेवलेल्या पिशवीची चोरी केली, त्यामध्ये सुमारे २० लाख रुपये किमतीचे सोने होते. या चोरीचा तातडीने तपास लावावा अशी मागणी आ.संग्राम जगताप यांनी केली आहे.

सध्या सणासुदीचे दिवस सुरू असून दिवाळी सणाच्या खरेदीसाठी नागरिक मोठ्या प्रमाणात बाजारात येत असतात, यामध्ये चोऱ्यांचे प्रमाण वाढणार असून गर्दीच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढवावा, नागरिकांच्या सुरक्षेतेची काळजी घेण्याची जबाबदारी ही पोलिसांची असून चोरांचा बंदोबस्त करावा, सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांची आयुष्यभराची असणारी पुंजीची चोरी होते ही खेदजनक घटना आहे तरी तातडीने चोरट्यांचा शोध घेऊन आडोळे परिवाराचा मुद्देमाल शोधावा अशी मागणी आमदार संग्राम जगताप यांनी तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. यावेळी स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे, माजी विरोधी पक्ष नेते संपत बारस्कर, माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, सुनील भालेराव, राहुल कातोरे, सुदर्शन बनसोडे, विकी देठे, शिवाजी कळमकर, गोरख भिंगारदिवे, प्रशांत बेल्हेकर आदी उपस्थित होते.

# बँक कर्मचाऱ्यांना भाऊबीजेच्या दिवशी सुटी द्यावी

नगर – महाराष्ट्र शासनाने २३ ऑक्टोबर रोजी भाऊबीजेच्या दिवशी राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांना सार्वजनिक सुट्टी जाहिर केल्याचे समजले असुन त्याबद्दल अभिनंदन. पुर्वी महाराष्ट्रातील सर्व बँक कर्मचाऱ्यांना भाऊबीजेच्या दिवशी सुट्टी मिळत होती परंतु काही कारणास्तव ती नंतर खंडीत करण्यात आली. भाऊबीज हा आपल्या हिंदु धर्मातील अत्यंत महत्वाचा पवित्र आणि भावनिक असा सण असुन या दिवशी बहिणी आपल्या भावांना ओवाळणी करून त्यांच्या दिर्घायुष्यासाठी प्रार्थना करतात.

कर्मचाऱ्यांना त्यांच्या कुटुंबियांसोबत हा सण साजरा करण्याची संधी मिळणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे Negotiable Instruments Act, 1881 अन्वये २३ ऑक्टोबर रोजी भाऊबीजेच्या दिवशी महाराष्ट्र राज्यातील सर्व बँक कर्मचाऱ्यांना देखील सुट्टी जाहिर करण्यात यावी, महाराष्ट्र प्रदेश बँक वर्कर्स ऑर्गनायझेशन (एन. ओ. बी. डब्ल्यु. आणि भारतीय मजदुर संघाशी संलग्न) म्हणुन सदर मागणीकडे सकारात्मक दृष्टीने विचार करुन व बँक कर्मचाऱ्यांच्या भावना लक्षात घेवून सुट्टी जाहीर करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश बँक वर्कर्स ऑर्गनायझेशनने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवसी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसव्दारे कळविणेत येते की,खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिला बरोबर ठरला असुन सदर मिळकत निर्वेध,निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणुन या जाहीर नोटीसव्दारे कळविणेत येते की,सदर मिळकतीबाबत कोणताही वाद चालु असल्यास अथवा गहाण,दान,बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा,भाडेकरार,साठेकरार,मदार,मनाई हुकूम, स्थगिती,पोटगी,चार्ज,लीज,इजमेंट,वारसा हक्क अथवा इतर कोणताही हक्क व अधिकार असल्यास अगर इतर कोणताही न्यायालयीन वाद चालू असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून **७ दिवसांचे आत** खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा नोंदणीकृत पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नक्कलासह आम्हांस कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. **ही नोटीस प्रसिद्धीस दिली.ता.१३/१०/२०२५**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन : मिळकत वर्णन :–** जिल्हा अहमदनगर पोटतुकडी तहसिल नगर पैकी, मौजे.सावेडी येथील अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील खालील वर्णनाचे बिगरशेती भुखंड.

| सर्व्हे नं. व प्लॉट क्र. | क्षेत्रफळ चौ.मीटर | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| ४०/६/प्लॉट क्र.२६ | १२६.०० | प्लॉट क्र.३२ | प्लॉट क्र.२७ | ६ मी रोड | प्लॉट क्र.२५ |
| ४०/६/प्लॉट क्र.२७ | १२६.०० | प्लॉट क्र.३१ | प्लॉट क्र.२८ | ६ मी रोड | प्लॉट क्र.२६ |
| ४०/६/प्लॉट क्र.३१ | १५५.०० | ६ मी. रोड | प्लॉट क्र.३० | प्लॉट क्र.२७ | प्लॉट क्र.३२ |
| ४०/६/प्लॉट क्र.३२ | १५५.०० | ६ मी. रोड | प्लॉट क्र.३१ | प्लॉट क्र.२६ | प्लॉट क्र.३३ |

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक**
आमेनाखातून शकील अहमद खान उबैद शकील अहमद खान,
खान एहसान शकील अहमद खान, रा.अहिल्यानगर.

**ॲड.राहुल धैर्यशील जोंधळे**
बं.नं.–८०, साईकृपा, अंबिकानगर,
केडगाव, अहिल्यानगर
मो : ९८५०५५३४४५



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीचा व्यवहार मिळकतीचे विद्यमान मालक तात्याभाऊ भगवंता जाधव व इतर संमती देणार यांनी आमचे अशिलाबरोबर केलेला आहे. आमचे अशिल लवकरच ठरलेला व्यवहार पूर्ण करणार आहेत. सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असून त्यांना सदर मिळकत विक्री करण्याचा अधिकार आहे अशी खात्री व भरवसा आमचे अशिलास दिला आहे. सबब सदर शेती मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा खरेदी, गहाण, दान, बक्षीस, जामिनकी, अन्नवस्त्राचा करार, साठेखत, हक्क, अधिकार, हितसंबंध, वारसा हक्क, इजमेंटरी राईटस, दावा, मनाई हुकूम, अव्वल जप्ती, चार्ज, नजरगहाण, अदलाबदल लेख अथवा अन्य कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांचे असलेले हक्क हितसंबंधाबाबत कागदपत्रांसहीत खालील सही करणार यांचेकडे ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आत लेखी कळवावे. सदर मुदतीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदरहु मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारे हक्क, अधिकार व हितसंबंध नाही, अगर संबंधितांनी सदरचा हक्क जाणीवपुर्वक सोडुन दिला आहे असे गृहित धरुन आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व नंतर कोणाचीही कसलीही तक्रार, हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट : १) मिळकतीचे वर्णन :–** जिल्हा अहमदनगर पोट तुकडी तालुका नगर पैकी मौजे वारुळवाडी हद्दीतील शेती मिळकत खालील वर्णनाची

| गट नंबर | क्षेत्र हे.आर | खरेदी दिलेले क्षेत्र हे.आर |
|---|---|---|
| १५/४ | १.१२.०० | ० हे २.१ आर |

**मधील मिळकत यांसी चतु:सिमा**
पुर्वेस – जयराम कर्डिले दक्षिणेस – रस्ता
पश्चिम – शिवाजी जाधव उत्तर – शिव रस्ता
येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक बिगरशेती प्लॉट मिळकत, तदंगभूत वस्तूसुध्दा व वागणुकीचे व वहिवाटीचे हक्कसुध्दा, काहीएक राखून न ठेवता संपूर्ण मिळकत.

अहमदनगर
ता. १३/१०/२०२५

**ॲड.संकेत सा.सुंबे**
चेंबर नंबर २०५, लॉयर्स चेंबर, जुने जिल्हा न्यायालय,
अहमदनगर, फोन : ९४०५१३३०७७


# संत अन्ना चर्च समोरील रस्त्याची त्वरित दुरुस्ती करावी



नगर – जुन्या कलेक्टर कचेरी समोरील खड्ड्यांचा रस्ता व उघडी गटार त्वरित दुरुस्त करण्याची मागणी संत अन्ना चर्चच्या शिष्टमंडळाच्या वतीने सहाय्यक आयुक्त सपना वसावा यांच्याकडे करण्यात आली. यावेळी चर्चचे सभासद विक्टर पवार, संजय मकासरे, अब्राहम अरुण, लोकेश बर्वे आदीसह चर्चचे सभासद उपस्थित होते.

चर्चच्या गेट समोर अनेक दिवसापासून एक उघडी गटार असून त्यामुळे चर्चमध्ये येणाऱ्या जाणाऱ्या भाविकांना नाक बंद करून चर्चमध्ये प्रवेश करावा लागत आहे. या उघड्या गटारीमुळे अनेक वेळा वाहन चालकाला अंदाज न आल्याने छोटे मोठे अपघात होत असून मनपाकडून गटार त्वरित बंद करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

मागील महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे संत अन्ना चर्च समोरील रस्ता पूर्णपणे वाहून गेला असून रस्त्यावर फक्त खडी शिल्लक असून रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे झाले असून छोटे मोठे अपघात होत आहेत. चांदणी चौक ते जुन्या कलेक्टर कचेरीकडे जाणारा हा रस्ता रहदारीचा असून या ठिकाणाहून दररोज हजारो लोक कामानिमित्त कलेक्टर ऑफिस या ठिकाणी येतात. २५ ऑक्टोबर ला मत माऊलीची वार्षिक यात्रा असून या यात्रेला संपूर्ण जिल्ह्यातून भाविक दर्शनासाठी येत असतात त्यामुळे महानगरपालिकेने त्वरित हा रस्ता दुरुस्त करावा, अशी मागणी चर्चच्या सभासदाच्या वतीने महापालिकेकडे करण्यात आली आहे.

